बी.एम.
प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के



दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | बुधवार,दि.३० एप्रिल २०२५ |वर्षे४थे| अंक२५८वा| पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



बी.एम.
प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के


# सरकारने विमा योजना गुंडाळली

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय ▶ सुधारित पीक विमा योजनेला मान्यता ▶ सुधारित पीक विमा योजनेला मान्यता ▶ एक रुपयांचा पीक विमा ठरली होती वादग्रस्त ▶ बोगसगिरीला आळा बसविण्यासाठी घेतला निर्णय

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई : गैरप्रकार आणि बोगस शेतक–यांच्या नोंदी करून कोट्यवधी रुपये लाटल्याचे उघड झाल्यामुळे वादग्रस्त ठरलेली एक रुपयातील पीक विमा योजना अखेर राज्य सरकारने गुंडाळली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत पीक विमा योजनेत बदलास मंजुरी देताना, कापणी प्रयोगावर आधारित विमा योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार राज्यातील शेतक–यांसाठी आता पूर्वीप्रमाणेच पीक विम्यापोटी आपला हिस्सा भरावा लागेल. शेतक–यांकडून खरीप पिकासाठी दोन टक्के रब्बी पिकासाठी दीड टक्के व नगदी पिकांना पाच टक्के हप्ता घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.



या पूर्वीच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या सरकारने सन २०२३–२४ मध्ये शेतक–यासाठी एक रुपयात पीक विमा योजना सुरु केली होती. सरकारने या योजनेचा चांगलाच गाजावाजा केला. परिणामी या योजनेत सहभागी होणा–या शेतक–यांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली होती. याशिवाय गेल्या वर्षी पार पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात भाजपचे आमदार सुरेश धस यांनी पीक विमा योजनेतील घोटाळा उघड केला होता. या घोटाळ्याच्या चौकशीत शेतकरी नसलेल्या व्यक्तींच्या नावे पीक विमा उतरविण्यात आल्याचे आढळून आले होते. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने १ रुपयात पीक विमा योजना बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत सर्वसमावेशक पीक विमा योजनेत बदल करुन, पीक कापणी प्रयोगांवर आधारित सुधारित पीक विमा योजना राबविण्यास आणि केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शेतक–यांकडून शेतकरी हिस्सा, खरीप पिकासाठी २ टक्के , रब्बी पिकासाठी १.५ टक्के आणि नगदी पिकांना ५ टक्के याप्रमाणे ठेवण्यास मान्यता देण्यात आली.राज्यात सध्या २६ जून २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार पंतप्रधान पीक विमा योजना खरीप हंगाम २०२३ ते रब्बी हंगाम २०२५–२६ हंगामासाठी लागू करण्यात आली आहे. मात्र, आता सुधारित पीक विमा योजना राबवताना नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ही निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर प्राप्त होणारी विमा हप्ता दरांच्या तुलनात्मक माहितीच्या आधारे तसेच राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या मान्यतेने योजना लागू होईल. याबरोबरच पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत राबविण्यात येणारी पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना आहे. त्या स्वरूपात चालू ठेवण्यासाठी मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

### पुढील ५ वर्षांत २५ हजार कोटींची गुंतवणूक

शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी नवीन योजना राबविण्यासाठी पुढील पाच वर्षात दरवर्षी पाच हजार कोटी याप्रमाणे एकूण २५ हजार कोटींची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

### पीक विमा योजनेतील सहभागी शेतकरी

२०२१–२२.. ९६ लाख
२०२२–२३.. १ कोटी ४ लाख
२०२३–२४.. २ कोटी ४२ लाख

### कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्मितीवर भर !

शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढून पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी नवीन योजना राबविण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. वातावरण अनुकूल शेतीसाठी आणि शेतक–यांच्या शाश्वत विकासासाठी शेतक–यांना सक्षम बनविणे आवश्यक आहे. शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेसाठी पुढील पाच वर्षांत दरवर्षी पाच हजार कोटी याप्रमाणे एकूण २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यास मंजुरी देण्यात आली.

## ..अन् आजीला मिळाले अनुदान

### तत्पर:तहसीलदारांचा पुढाकार



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:डीबीटीची प्रक्रिया उशिरा केल्याने कुमशीच्या केशरबाई मंचारे या ८० वर्षीय आजीना अनुदान मिळत नव्हते . या आजी तहसील कार्यालयात येरझऱ्या मारत होत्या . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आजींकडे पाहिले आणि त्यांना कामाबाबत विचारणा केली . डीबीटी प्रक्रिया उशिरा झाल्याने आजींचे अनुदान मिळाले नव्हते . तात्काळ तहसीलदार शेळके यांनी सीएससी सेंटर चालकास सूचना देत आजींची डीबीटी प्रक्रिया तातडीने करून घेण्याचे आदेश दिले . त्यानुसार केंद्र संचालक सतीश जाधव यांनी सर्व प्रक्रिया केली . आजींच्या खात्यावरील दहा हजार रुपये रोख रक्कम काढून आणण्यात आली . ही रक्कम तहसीलदारांच्या हस्ते आजींना सुपूर्द करण्यात आली . त्यामुळे आजींनी सर्वांचे आभार मानले .

यावेळी तहसिलदार चंद्रकांत शेळके , पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर , संजय गांधी निराधार विभागाच्या अव्वल कारकून हेमलता परचाके , तलाठी लक्ष्मण आगलावे , संजय गांधी निराधार विभागाच्या महसूल सहायक वैशाली बहीरवाळ , सतीश जाधव , संतोष काकडे आदिंची उपस्थिती होती .सध्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाभरात संजय गांधी , श्रावणबाळ विभागामार्फत गावोगावी कॅम्पचे आयोजन करण्यात येत असून लाभार्थ्यांची डीबीटी प्रक्रिया पूर्ण करून देण्याची मोहीम प्रशासनाने हाती घेतली आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके हे वेळोवेळी नायब तहसीलदार , ▸▸ पान २ वर

## सुशील सोळंकेचा जामीन अर्ज फेटाळला

### चर्चेतले:आ. प्रकाश सोळंकेंच्या समर्थकाचा पाय खोलात

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:येथील आ.प्रकाश सोळंके यांचे खंदे समर्थक व पंचायत समितीचे माजी उपसभापती सुशील विजयकुमार सोळंके याचा प्रथमदर्शनी गुन्हयातील सहभाग, गुन्हेगारी पार्श्वभुमी या कारणास्तव अटकपूर्व जामीन अर्ज माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबादचे माननीय न्यायमुर्ती श्री अरुण पेडणेकर यांनी फेटाळला आहे.

पोलीस ठाणे माजलगाव शहर जिल्हा बीड येथे फिर्यादी अशोक बाळासाहेब सोळंके याने सुशिल साळुंके व इतर ६ आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली होती. फिर्यादीने फिर्यादीत म्हटले होते की, आरोपी सुशिल साळुंके याची आई ग्रामपंचायत सरपंच आहे. फिर्यादी व त्याच्या भावाने ग्रामपंचायत निवडणुकीत आरोपीच्या आई विरोधात प्रचार केला होता. फिर्यादीने ग्रामपंचायत कारभाराविरुध्द उपोषण केले होते. तू आमच्या विरोधात उपोषण का करतोस या कारणास्तव आरोपीतांनी फिर्यादीच्या दुकानात बेकायदेशिररित्या प्रवेश करुन त्याला मारहाण केली व दुकानातील वस्तुंची मोडतोड करुन नुकसान केले. तसेच आरोपी सुशिल साळुंकेने फिर्यादीचा मोबाईल घेऊन गेला. या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल झाला होता. सुशिल साळुंके याचा अटकपूर्व जामीन अर्ज माननीय सत्र न्यायालय ▸▸ पान २ वर

## तलवाडा येथे पोलिसांची कारवाई

### पेट्रोलिंग:चार संशयित घेतले ताब्यात

गेवराई प्रतिनिधी

तलवाडा:गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे रात्रीच्या गस्तीदरम्यान तलवाडा पोलीस ठाण्याच्या पथकाने दोन स्वतंत्र घटनांमध्ये चार संशयितांना ताब्यात घेतले. पोलीस कॉन्स्टेबल सुग्रीव दत्तु रुपनर (वय ३९) आणि पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील दिलीप कोळी (वय ३७) यांनी केलेल्या या कारवाईमुळे संभाव्य गंभीर गुन्हे टळले.पहिल्या घटनेत, दिनांक २९ एप्रिल रोजी मध्यरात्री १२:३० वाजता शिवाजी चौकात साई मंदिराजवळ रुषी दादाभाऊ मरकड (वय २८) आणि सुभम संजय गिल (वय २५), दोन्ही रा. तलवाडा, हे संशयास्पदरीत्या आंधारात लपून बसलेले आढळले. पोलिसांनी विचारपूस केली असता, त्यांनी पळण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून त्यांना पकडले. त्यांनी थांबण्याचे समाधानकारक कारण न सांगितल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या मते, यापासून जबरी चोरी, घरफोडी किंवा वाळू चोरीसारखा गुन्हा घडण्याची शक्यता होती.दुसऱ्या घटनेत, पहाटे ०१:३० वाजता राजापूर फाट्याजवळ वैभव▸▸ पान २ वर

## सौर ऊर्जा प्रकल्पामुळे आधार मिळाला

### खा पाटील:उमरी शिवारात सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे. सौर ऊर्जा ही काळाची गरज आहे. शाश्वत विकासासाठी असे प्रकल्प उभारले पाहिजेत असे मत खा.रजनीताई पाटील यांनी केले त्या उमरी शिवारातील गंगा माऊली शुगर अँड अलईमेंट अंतर्गत चा ३ मॅगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ मंगळवार रोजी झाला. यावेळी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.गंगा माऊली शुगरचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे,माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील,काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, हनुमंत मोरे,बाबाराजे देशमुख,उमरीचे सरपंच अमोल मुळे,उप कार्यकारी अभियंता श्री सय्यद,महेश अंडील, आदित्य ग्रीन एनर्जीचे जेयश बजाज, स्टेट बँक ऑफ इंडिया चे मनदीप वर्मा, गंगा माऊली उद्योग समूहाचेप्रवीण मोरे,अविनाश मोरे, तेजस्विनी पाटील,देविका पाटील,रेवती सोनवणे,आदींची उपस्थिती होती. ▸▸ पान २ वर

## गेवराईत तरुणावर जीवघेणा हल्ला

### खळबळ:शेख नईम गंभीर जखमी

गेवराई प्रतिनिधी

गेवराई:शहरातील संजयनगर परिसरात दि. २८ एप्रिल रोजी सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास एक धक्कादायक घटना घडली. २८ वर्षीय तरुण शेख नईम खयामोद्दीन याच्यावर चार ते पाच जणांनी मिळून तलवार आणि कोयता यांसारख्या धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात शेख नईम गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने गेवराई उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की शेख नईम हा आपल्या दैनंदिन कामात असताना अचानक चार ते पाच जणांच्या टोळक्याने त्याच्यावर हल्ला चढवला. हल्लेखोरांनी तलवार आणि कोयता यांसारख्या धारदार शस्त्रांचा वापर करून नईमवर अनेक वार केले, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला. हल्ल्याची माहिती मिळताच स्थानिकांनी तातडीने पोलिसांना कळवले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता स्थानिकांनी जखमी नईमला त्वरित उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले.या हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेमुळे संजयनगर आणि परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अशा प्रकारच्या हिंसक घटना गेवराई शहरात क्वचितच घडतात, ▸▸ पान २ वर

शोककळा

वाहेगाव आमलातील हृदयद्रावक घटना

## मुलाच्या आत्महत्येनंतर आईनेही जिवन संपवविले

गेवराई प्रतिनिधी

गेवराई: तालुक्यातील वाहेगाव आमला या छोट्याशा गावात एक हृदय पिळवटून टाकणारी आणि मन सुन्न करणारी घटना घडली आहे. एका तरुणाने स्वतःचे आयुष्य संपवल्याच्या धक्कादायक बातमीनंतर, त्याच्या आईनेही प्रचंड मानसिक आघातातून आत्महत्येचा मार्ग निवडला. या दुहेरी मृत्यूंमुळे गावात शोककळा पसरली असून, प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू आणि मनात असंख्य प्रश्न उभे राहिले आहेत.

अभिमान खेत्रे (वय ३६) या तरुणाने दि. २८ एप्रिल रोजी दुपारी आपल्या राहत्या घरी फाशी घेऊन जीवन संपवले. ही मन हेलावून टाकणारी बातमी त्याच्या आई, कौशल्या भागुजी खेत्रे (वय ७०) यांना समजताच





त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. आपल्या लाडक्या मुलाला गमावल्याचे दुःख त्यांना सहन होणे अशक्य झाले. प्रचंड मानसिक तणावातून त्यांनी काही वेळातच विषारी औषध प्राशन केले. अभिमानचा मृत्यू सोमवार रोजी सायंकाळी ४ ▸▸ पान २ वर

### गावकऱ्यांचे डोळे पाणावले

एका कुटुंबातील दोन व्यक्तींच्या या आत्महत्यांनी वाहेगाव आमला गावाला मोठा धक्का बसला आहे. कौशल्याबाईंच्या डोळ्यांसमोर त्यांच्या मुलाचा मृत्यू आणि त्यानंतर त्यांनी घेतलेला टोकाचा निर्णय यामुळे नातेवाईक, शेजारी आणि गावकरी हादरून गेले आहेत. अभिमान आणि त्याच्या आईचा असा अंत होईल, याची कोणालाही कल्पना नव्हती. दोघेही आमच्यासाठी जवळचे होते, असे गावातील एका नागरिकाने डोळ्यात अश्रू साठवत सांगितले. गावात सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून, शोकाकुल वातावरण पसरले आहे.

## परळी रेल्वे रुळावर आढळला मृतदेह

### खळबळ:डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मलकापुर शिवाराच्या रेल्वे पटरीवर आज (दि.२९) मंगळवार रोजी सकाळी तरूणाचा मृतदेह आढळुन आला. सदरील हा तरूण रेल्वेतून पडला असल्याचे सांगण्यात येत असले तरी तो रेल्वे पटरीच्या मध्यभागी कसा पडेल ? असा प्रश्न ही उपस्थित होत आहे. हा अपघात आहे की घातपात ? याचा शोध परळी पोलीस घेत आहेत.

आज सकाळी काही लोकांना मलकापुर शिवारात असलेल्या रेल्वे पटरीवर तरूणाचा मृतदेह आढळून आला. त्याच्या डोक्याला गंभीर स्वरूपाच्या जखमा होत्या. घटनास्थळी डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याचे दिसून येत होतं. घटनेची माहिती परळी पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी रूग्णालयात आणला होता. मयताची दुपारी ओळख पटली असून शहाबुद्दीन अब्दुल करीम मुल्ला वय ३६ वर्ष राहणार बनशेळकी तालुका उदगीर जिल्हा लातूर असं त्याचं नाव आहे.सायंकाळी सात वाजता त्याचे नातलग उपजिल्हा रुग्णालयात आले असून त्याचे शवविच्छेदन चालू आहे. प्रवास करतांना पडल्यामुळे त्याचा मृत्यु झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असला तरी ▸▸ पान २ वर

## भारतीय क्रिकेटचे वैभव

भारत आणि पाकिस्तानच्या आकाशात युद्धाचे ढग 'गरजत' असताना सोमवारी इंडियन प्रीमियर लीगमध्ये जयपूरच्या सवाई मानसिंह स्टेडियमवर १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या बॅटने धावांची बरसात केली. त्याचे शतकी वादळ असे काही घोंघावले की त्याच्या तडाख्यात अनेक जागतिक विक्रम भुईसपाट झाले आणि नवे विक्रम प्रस्थापित झाले. वैभवने आयपीएलच्या इतिहासातील सर्वांत युवा शतकवीर ठरताना ३८ चेंडूंत १०१ धावांची तुफानी खेळी साकारली. आयपीएलमध्ये सर्वाधिक वेगवान शतक वेस्ट इंडिजच्या ख्रिस गेलच्या नावावर आहे. त्याने ३० चेंडूंत शतक ठोकले होते. त्यानंतर ३८ चेंडूंत शतकी मजल मारून भारताच्या युसूफ पठाणने दुसरा क्रमांक पटकावला होता. सोमवारी वैभवने पठाणचा विक्रम खालसा करत अवघ्या ३५ चेंडूंत शतक झळकावले आणि सर्वाधिक वेगवान शतक ठोकणारा पहिला भारतीय ठरला. आपल्या शतकी खेळीत त्याने ७ चौकार आणि ११ षटकार ठोकले. बिहारमध्ये जन्मलेल्या वैभवच्या ओठावर अजून मिसरूड फुटलेले नाही, त्याचे ओठ पिळले तर दूध गळेल की काय अशी स्थिती, चेह-यावर अत्यंत निरागस, निष्पाप असे भाव परंतु या पोराच्या हातात राक्षसी ताकद आहे. त्याच्या बॅटचा झपाटा पाहून गोलंदाजांना तो अतिरेक्यासारखा भासत असेल. यंदाच्या आयपीएलमध्ये 'एक बिहारी, सौ पे भारी' ठरतोय यात शंका नाही.

आयपीएलमधील त्याचा हा तिसराच सामना होता. पहिल्या सामन्यात तिसेक धावा काढून वैभव बाद झाला तेव्हा तंबूकडे परतताना त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. गुजरातविरुद्धच्या सामन्यात शतकी खेळी करून तंबूकडे जाताना सुद्धा तो अश्रू गाळत होता, हे अश्रू आनंदाचे असले तरी त्याला थोडी दु:खाची किनार होती. ती यासाठी की शतक झळकल्यानंतर अख्ख्या स्टेडियमने उभे राहून मानवंदना दिली होती, वैभवचे कोच 'द वॉल' राहुल द्रविडही उभे राहून दाद देत होते. उभे राहताना द्रविड थोडेसे अडखळले, कारण त्यांचा पाय फ्रॅक्चर होता. वैभवचे अश्रू त्यासाठी होते. अवघ्या तीन सामन्यांत वैभवने आपल्या बिहार राज्याचे नाव रोशन केले आहे. जनावराचा चारा खाणारे राज्य म्हणून ज्या राज्याची नाचक्की झाली होती, त्या बिहारला अभिमान वाटावा अशी कामगिरी वैभवने करून दाखवली आहे. वैभवच्या वयाबद्दल अनेक जण संशय व्यक्त करतात, तो १४ वर्षांचा नसून २२ वर्षांचा असावा अशी शंकाही व्यक्त करतात.

परंतु या वयात त्याने आंतरराष्ट्रीय गोलंदाजांविरुद्ध आपल्या फटक्यातून जे सिलेक्शन आणि टायमिंग दाखवले आहे ते अफलातूनच म्हणावे लागेल. त्याला ती दैवी देणगी आहे असे म्हणावे लागेल. गुजरातविरुद्धच्या सामन्यात पहिल्या चेंडूपासून त्याने आक्रमक धोरण स्वीकारले आणि अवघ्या १७ चेंडूंत अर्धशतकाची वेस ओलांडली. आयपीएलमध्ये अर्धशतक झळकावणारा तो युवा फलंदाज ठरला. नंतर केवळ १८ चेंडूंत त्याने शतकी मजल मारली. आयपीएलमध्ये आंतरराष्ट्रीय गोलंदाजांना तोंड देणे म्हणजे पोरासोराचे काम नाही. नाही तरी १४ वर्षांच्या वयात भारतीय मुलं काय करत असतील? एकतर परीक्षेची तयारी करत असतील, वैभवसारखी शतक ठोकत असतील आणि पाकिस्तानातील मुलं अतिरेकी बनत असतील! म्हणजे हा संस्कार आणि संस्कृतीतील फरक म्हणावा लागेल. सध्या पांढ-या चेंडूच्या क्रिकेटची चलती आहे. मर्यादित षटकांचे, टी-२० क्रिकेट अतिशय लोकप्रिय आहे. युवा भारतीय क्रिकेटपटूंच्या हातात भारतीय क्रिकेटचे 'वैभव' सुरक्षित आहे यात तिळमात्र शंका नाही.

डावखुरे युवा क्रिकेटपटू तर अक्षरश: 'छा गये है' असेच म्हणावे लागेल. यशस्वी जयस्वाल, साई सुदर्शन, अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, देवदत्त पडिक्कल, ईशान किशन या तरुणाईने कहर मांडला आहे. टी-२० मध्ये तुमच्या तंत्राला महत्त्व नाही, तुम्ही कशा आणि किती धावा काढता याला अधिक महत्त्व आहे. त्यामुळे काही जण या क्रिकेट प्रकाराला नाके मुरडतात. परंतु आजच्या धावत्या जगात चमत्काराला नमस्कार करतात.. त्यामुळे नाइलाजाने का होईना आपल्याला नमस्कार करावा लागतोच. भारतीय क्रिकेटच्या क्षितिजावर एक नवा तारा उदयास आला आहे, त्याचे नाव वैभव सूर्यवंशी. १४ वर्षांच्या वैभवने क्रिकेटच्या मैदानावर अशी काही जादू दाखवली की सध्या क्रिकेट विश्वात त्याच्याच नावाची चर्चा आहे. बिहारच्या समस्तीपूर जिल्ह्यातील ताजपूर गावात एका शेतकरी कुटुंबात वैभवचा जन्म झाला. अवघ्या चौथ्या वर्षापासूनच त्याला क्रिकेटचे वेड लागले. वडील संजीव सूर्यवंशी यांनी त्याच्या क्रिकेटच्या स्वप्नांना पंख दिले. कुटुंबाने आर्थिक अडचणींना तोंड देताना वेळप्रसंगी जमीनही विकली, पण वैभवच्या प्रतिभेला खुलवण्यासाठी त्यांनी कधीच माघार घेतली नाही. वैभवने स्थानिक क्रिकेटमध्ये चमक दाखवली. वयाच्या १२ व्या वर्षी रणजी ट्रॉफीत तर १३ व्या वर्षी विजय हजारे ट्रॉफीत पदार्पण केले.

आयपीएल २०२५च्या लिलावात राजस्थान रॉयल्सने त्याला १ कोटी १० लाख रुपये खर्चून आपल्या ताफ्यात सामील केले तेव्हा तो आयपीएल करार मिळवणारा सर्वांत कमी वयाचा (१३ वर्षे) खेळाडू ठरला. वैभवने आयपीएलच्या पदार्पणात लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकला आणि गुजरात टायटन्सविरुद्धच्या आपल्या तिस-याच सामन्यात शतकी मजल मारताना राशीद खानच्या चेंडूवर षटकार मारला. वैभवच्या शतकी खेळीचे कौतुक गुजरातच्या खेळाडूंनीसुद्धा केले. वैभवकडे अफाट प्रतिभा आहे, आता त्याने दीर्घकालीन करिअरवर लक्ष केंद्रित करायला हवे. त्याच्यावर अपेक्षांचा दबाव आहे पण मानसिक ताकद आणि प्रतिभेच्या जोरावर त्याला दबाव झुगारून देता येईल. वैभवचे कौतुक करताना मास्टर ब्लास्टर म्हणतो- वैभवचा निडर दृष्टिकोन, बॅट स्विंग, चेंडूचा टप्पा साधण्याचे कसब आणि चेंडू ठोकताना लावलेली ताकद, त्याच्या सुंदर खेळीचा मंत्र होता. 'गरज गरज आज मेघ'च्या शेवटच्या ओळीत थोडासा बदल करून म्हणता येईल- 'कहत रे, वैभव आयो रे'!

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ताकदीने लढवू

## आ.संदीप क्षीरसागर: गेवराईत साधला संवाद

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढवून, सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या पाठीशी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद उभी करणार आहे. त्यामुळे,पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी ,कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांनी येथे केले आहे. रविवार ता. २८ रोजी सायंकाळी सात वाजता आमदार क्षीरसागर यांनी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गेवराई तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांच्या संपर्क कार्यालयात भेट देऊन, कार्यकर्त्यांशी संवाद साधला. ते म्हणाले की, गेवराई मतदारसंघातील जनतेने लोकसभा निवडणुकीत भरघोस प्रतिसाद दिला. खा. बजरंग बप्पा सोनवणे यांना मोठी मदत करून मतदारसंघातील मायबाप जनतेने प्रचंड लीड दिली. आता, येणाऱ्या काळात गेवराई मतदारसंघातील पक्षाच्या कार्यकर्त्यांना बळ द्यायचे काम आदरणीय शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखालीच करणार आहे. या पुढच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकीत ताकदीने उतरणार आहे. नगर परिषद, जिल्हा परिषद,



पंचायत समितीच्या निवडणुकीत पक्षाची ताकद दाखवून देण्यासाठी मी स्वतःच गेवराई मतदारसंघात वेळ देणार आहे. पक्षाचे अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तालुक्यातील सर्व स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या निवडणुका लढवून, सामान्य कार्यकर्त्यांना न्याय द्यायची भूमिका आम्ही पार पाडू, त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या तयारीला लागावे, असे आवाहन ही आमदार संदीप क्षीरसागर यांनी येथे बोलताना केले. गेवराई तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांच्या कामावर समाधान व्यक्त करून, सामान्य चळवळीतल्या कार्यकर्त्यांना बळ देणार असून, राठोड यांची दखल घेऊ, अशी भावना ही त्यांनी व्यक्त केली. सर्वांच्या सहकार्याने आगामी काळातील सर्व निवडणुका नियोजन पद्धतीने निवडून येण्यासाठी लढवू असे मत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी व्यक्त केले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के , माजी आ. सय्यद सलीम , युवा नेते ऋषिकेश बेद्रे ,अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष इरफान भाई ,शहराध्यक्ष सय्यद अख्तर, इरशाद भाई ,अलीम सय्यद ,खांडवीचे उपसरपंच विनायक चव्हाण, कुंभेजळगाव उपसरपंच सद्दाम भाई , व्हीजीएनटी तालुका उपाध्यक्ष अशोक राठोड, माजी उपसरपंच बाबासाहेब राठोड ,माजी उपसरपंच साहेबराव राठोड ,राम नाना राठोड ,अजिर पवार , नितीन पवार ,मानिक राठोड ,सतोष चव्हाण अचित महाराज ,गणेश राठोड ,धनू चव्हाण ,शरद पवार ,सुभाष महाराज, बाबासाहेब चव्हाण ,प्रकाश चव्हाण बबन राठोड ,आनंद चव्हाण , सतोष जाधव, रमेश जाधव, रेवन चव्हाण, विजय पवार, भोगलगावकर मजेर शेख ,अशोक राठोड यांच्या सह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# वर्गमित्रांची भरली पून्हा शाळा; तब्बल २८ वर्षांनी मित्र-मैत्रिणीची भेट



तलवाडा/प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील जि ,प,परिषद शाळा ,व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा या शाळेत दहावी व बारावी शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थी तथा वर्ग मित्र यांनी सन १९९७ च्या एस. एस .सी .बॅचचा भव्य स्नेहमिलन दिं.२७/४/२०२५ रोजी लक्की लॉन्स येथे सोहळा आयोजित करण्यात आला होता. जि,प, मा, शाळा तलवाडा जयभवानी माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे शिक्षण घेतलेल्या सन १९९७साली S.S.C. झालेल्यासर्व माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेह मिलन मेळावा लक्की लॉन्स तलवाडा येथे उत्साहातपार पडला .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य पटेल, तर प्रमुख अतिथी सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी बन सर , मुख्याध्यापक विजय डोंगरे ,प्राचार्य अरूण हाटकर, व त्याकाळी अध्यापन करणारे प्रा.सोलाट , वारे सर,, बोर्डे सर , राऊत सर , बांगर सर ,बांगर मॅडम ,भवार सर उपस्थित होते. विविध ठिकाणी व विविध क्षेत्रात कार्यरत असणारे अनेक मुले व मुली तब्बल २८ वर्षानंतर एकत्र आले .ऐकमेकांना परिचय देत सर्व जुन्या आठवणीना उजाळा दिला. दुर्दैवाने अकाली सोडून गेलेले वर्गमित्र गणेश बांगर , नामदेव मराठे , शिवाजी यादव , बंडु हात्ते , प्रशांत मदुरे यांना सर्वांनी श्रद्धांजली वाहिली. या कार्यक्रमात महेश शेटे यांनी माझी विद्यार्थ्याचे छोटे छोटे खेळ घेतले त्या नंतर स्नेहभोजन याने वातावरण हलके फुलके झाले. अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करतंना गुरुजनांप्रति आदरभावव्यक्त करत बालपणी च्या आठवणींना उजाळा दिला. बनसर,बोर्डेसर , पटेल सर यांनी जिवनात कधीही नाउमेद न होता संघर्ष करत राहण्याचा व ऐकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होण्याचा सल्ला दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख मुबिन ,महेश शेटे तसेच सर्व मित्र मंडळांनी खूप मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र राठोड व सतीश खेडकर यांनी केले तर आभारप्रदर्शन अमर नाटकर यांनी केले.



# मोबाईल हिसकावणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

बीड : बीड शहर व शिवाजीनगर परिसरात मोटारसायकलवर येत रस्त्यावरुन चालत असलेल्या नागरिकांचे मोबाईल हिसकावणाऱ्या दोन चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखा बीडच्या पथकाने अटक केली असून, त्यांच्या ताब्यातून तब्बल १० मोबाईल फोन व स्प्लेंडर मोटारसायकल असा एकूण २ लाख ८७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

फिर्यादी अभिषेक केदार यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती की, ११ एप्रिल रोजी रात्री पिंपरगव्हाण रोडवर चालत असताना तीन अज्ञात इसमांनी काळ्या स्प्लेंडरवर येत त्यांचा मोबाईल हिसकावून घेतला. यावरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता.या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला सोपवण्यात आला. पो.नि. उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे यांच्या पथकाने तपास सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे २८ एप्रिल रोजी समर्थ मंगल कार्यालयाजवळ सापळा लावून दोघा संशयितांना अटक करण्यात आली. त्यांची नावे आदित्य नरवडे (रा. बालेपीर) व नामदेव डोईफोडे (रा. ईट) अशी आहेत.चौकशीत त्यांनी मोबाईल हिसकावण्याच्या गुन्ह्यांची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून विवो, रियलमी, सॅमसंग, ओपो, पोको कंपनीचे एकूण १० मोबाईल व गुन्ह्यात वापरलेली स्प्लेंडर मोटारसायकल असा २.८७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.त्यांच्याविरोधात बीड शहर व शिवाजीनगर पोलीस ठाण्यांत आधीच ४ गुन्ह्यांची नोंद झाली असून, उर्वरित एक साथीदार पसार आहे. त्याचा शोध सुरु आहे.ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व पो.नि. उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे व त्यांच्या पथकाने केली.

पान एक वरून

**..अन् आजीला मिळाले**

मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून वयोवृद्ध लाभार्थ्यांना तहसील कार्यालयास येण्याची गरज भासू नये यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे .डीबीटीचा अर्ज भरून घेताना त्यावर मोबाईल क्रमांक सुद्धा टाकावा लागतो . आणि लगेच त्या मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी म्हणजेच वन टाइम पासवर्ड जातो . तो ओटीपी सांगावा लागतो . तो ओटीपी ऑपरेटरला सांगितल्यास लगेच डीबीटीची प्रक्रिया संपते . एकदा ओटीपी दिला आणि तो ऑपरेटर मार्फत संगणकावर नोंदविण्यात आला म्हणजे डीबीटीची प्रक्रिया संपलेली असते . या कॅम्पच्या वेळी कुर्ला गावच्या सरपंच मंडाबाई पांडुरंग मार्कड , उपसरपंच महादेव साहेबराव पटेकर , ग्रामपंचायत सदस्य शितल संदीप पाटील , औरंगपूरचे सरपंच गोरख महादेव चांगण , कुर्ला मंडळाचे मंडळ अधिकारी जितेंद्र वाघ , ग्राम महसूल अधिकारी संजय नेवडे , उमेश खिंडरे , दुष्यंत शेळके , सुनील प्रधान , ग्राम महसूल सेवक कृष्णा राठोड , महसूल सेवक जवरे , संगणक ऑपरेटर महेंद्र राऊत व गावकरी परीक्षित पाटील , ज्ञानेश्वर यादव , ग्रामपंचायत शिपाई बाबासाहेब कानडे , महादेव आरसुळ नवनाथ गव्हाणे , परमेश्वर गुंड , शेख खाजाभाई , भगवानराव यादव , दिगंबर शेवाळे उपस्थित होते . यावेळी बोलताना नायब तहसीलदार प्रशांत जाधव यांनी सांगितले की फार्मर आयडी सुद्धा शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक आहे . शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढून घ्यावा . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे स्वतः तालुक्यात फार्मर आयडी काढून घ्यावा यासाठी भेटी देत आहेत . तरी शेतकऱ्यांना आवाहन राहील की त्यांनी ग्री स्टॅक प्रकल्पांतर्गत आपला फार्मर आयडी काढून घ्यावा . त्यासाठी संबंधित ग्राम महसूल अधिकारी म्हणजेच तलाठी ग्रामसेवक अथवा गावचे कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा असेही त्यांनी सांगितले . बीड तालुका प्रशासनाचा वयोवृद्ध व अडाणी लाभार्थ्यांप्रती असलेला हा कनवाळूपणा निश्चितच अभिनंदन आहे . ग्रामीण भागातील लाभार्थी , नागरिक हे खरोखरच प्रशासनाचे आभारी आहेत , अशा स्वरूपाची चर्चा यावेळी ऐकण्यास मिळाली . खचितच अशाप्रकारे प्रशासन नागरिकांसाठी दोन पावले पुढे आले तर प्रशासनाकडे नागरिक आपोआपच आदराने बघतील यात शंका नसावी .

**सुशील सोळंकेचा जामीन**

माजलगाव यांनी फेटाळला होता. अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी आरोपींनी माननीय उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. या प्रकरणात फिर्यादीने ॲड. सुदर्शन साळुंके व ॲड. अमोल गायकवाड यांच्यामार्फत अर्ज दाखल करुन जामीन अर्जास विरोध दर्शविला होता.माननीय उच्च न्यायालयाने न्याय निवाडयात म्हटले आहे की, सीसीटीव्ही मध्ये सुशिल साळुंके याचा गुन्हयात प्रत्यक्ष सहभाग दिसून येतो. यापुर्वी सुध्दा सदर आरोपीविरुध्द गुन्हे दाखल आहेत. प्रथमदर्शनी आरोपींनी गुन्हा केल्याचे दिसून येत आहे.या प्रकरणात फिर्यादीतर्फे ॲड. सुदर्शन जी. साळुंके व ॲड. अमोल गायकवाड यांनी काम पाहिले तर सरकारतर्फे ॲड. एन.बी. पाटील यांनी काम पाहिले.

**तलवाडा येथे पोलिसांची**

भाऊसाहेब ढवारे (वय १९) आणि श्रावण कृष्णा मरकड (वय १९), दोन्ही रा. तलवाडा, हे हिरो पॅशन प्रो मोटारसायकल (क्र. चक२३ट३२९९) सह संशयास्पदरीत्या आढळले. त्यांनीही पळण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी त्यांना पकडले. त्यांनी स्पष्ट कारण न सांगितल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईने चोरीसारखे गुन्हे रोखले गेले.दोन्ही घटनांमध्ये महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १२२ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तलवाडा पोलिसांनी रात्रीच्या गस्तीवर भर देत परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कठोर पावले उचलली आहेत. या कारवाईमुळे स्थानिकांमध्ये सुरक्षिततेची भावना वाढली आहे.

**सौर ऊर्जा प्रकल्पामुळे**

उमरी गावकऱ्यांच्या वतीने शिवरात प्रकल्प उभा केल्यामुळे खा रजनीताई पाटील, लक्ष्मणराव मोरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना राहुल सोनवणे म्हणाले खा रजनीताई पाटील,लक्ष्मणराव मोरे यांनी या भागाचे नंदनवन केले. गंगा माऊली साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ऊसाला चांगला भाव मिळत आहे .उमरी भागातील शेतकऱ्यांना सौर ऊर्जा प्रकल्पामुळे दिवसभर विद्युत पुरवठा होणार असल्याने त्यांच्या जीवनात समृद्धी येईल असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातून शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गंगा माऊली शुगर इंडस्ट्रीज कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**गेवराईत तरुणावर जीवघेणा**

त्यामुळे स्थानिकांनी याबाबत चिंता व्यक्त केली आहे. काही नागरिकांनी पोलिस गस्त वाढवण्याची आणि परिसरात अधिक सुरक्षेची मागणी केली आहे. स्थानिकांनी पोलिसांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.शेख नईमच्या कुटुंबीयांवर या घटनेमुळे दुखाचा डोंगर कोसळला आहे. त्याच्या गंभीर प्रकृतीमुळे कुटुंबीय चिंतेत असून, हल्लेखोरांवर कठोर कारवाईची मागणी करत आहेत. नईम शेख गंभीर जखमी असल्याने या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल करण्यात आल नाही.

**मुलाच्या आत्महत्येनंतर आईनेही**

वाजता झाला, तर कौशल्याबाईंनी मंगळवार दि.२९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला.या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अभिमानने का टोकाचे पाऊल उचलले आणि त्यानंतर कौशल्याबाईंना का जीवन नकोसे वाटले, याची उत्तरे गावकऱ्यांना अस्वस्थ करत आहेत. स्थानिक पोलिसांनी आक्समिक मृत्युची नोंद करत या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे, परंतु गावकऱ्यांच्या मनात केवळ दुःख आणि हतबलता उरली आहे. गेवराई तालुक्यातील या हृदयद्रावक घटनेने सर्वांनाच हादरवून सोडले आहे. या कुटुंबाला या दुःखातून सावरण्यासाठी समाजाचा आधार आणि संवेदना हव्या आहेत.

ही घटना केवळ वाहेगाव आमलापुरती मर्यादित नसून, ती प्रत्येकाला अंतर्मुख करणारी आहे. मानसिक तणाव आणि दुःखाच्या क्षणी आधाराची गरज असते, हे या घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. गावकरी आता एकमेकांना धीर देत आहेत, परंतु अभिमान आणि कौशल्याबाईंच्या निघून जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून येणारी आहे.

**परळी रेल्वे रुळावर आढळला**

मृतदेहाची स्थिती रेल्वेच्या दोन रुळांच्या मध्यभागी आहे. त्यामुळे संशय व्यक्त केला जात आहे. हा अपघाता आहे की घातपात ? या प्रकरणाचा तपास परळी ग्रामीण पोलीस चे बडे हे करत आहेत.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे रेल्वे स्टेशनवर सुरक्षा व्यवस्था तैनात

## संवेदनशील शहर म्हणून घोषित

◆ **पुणे (प्रतिनिधी):**

पहगलाम येथील आतंकवादी हल्ल्यानंतर देशात अनेक ठिकाणी सतर्कतेची चेतावणी देण्यात आलेली आहे. पुणे हेही संवेदनशील शहर म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

पुणे विभाग, मध्य रेल्वेने प्रवाशांची व रेल्वे मालमत्तेची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सध्याच्या काळात नव्याने निर्माण होणाऱ्या सुरक्षेच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा उपाययोजना अधिक बळकट केल्या आहेत. विशेषतः पुणे स्थानकास संवेदनशील स्थानक म्हणून घोषित करण्यात आले असून खालील उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

**महत्त्वाच्या उपाययोजना:**

पुणे स्थानकावर संध्याकाळी अतिरिक्त निरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून नियमित आकस्मिक तपासणी केली जात आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर नियमितपणे बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. जीआरपी अधिकाऱ्यांसोबत समन्वय बैठकांचे आयोजन केले जात आहे. श्वान पथकांच्या मदतीने तपासणी करण्यात येत आहे. सर्व शिफ्ट इनचार्ज व ड्युटी ऑफिसर्स आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या सर्क्युलेटिंग क्षेत्रात शस्त्रासह ड्युटी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. स्थानक परिसरात अतिरिक्त तपासणी व गस्त वाढविण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना अगदी कमी कालावधीत सूचना मिळताच तातडीने आवश्यक जागी जमा होण्यासाठी तयार राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ताडीवाला रोड, पुणे येथे प्रत्येकी ३० खाटांच्या दोन बरॅक्स तयार करण्यात आल्या आहेत.



जवळ राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी डीएससीआर पुणे येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्वरित माहिती प्रसारित करण्यासाठी एक आपत्कालीन व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आला आहे. प्रत्येक पाळीत एक अधिकारी व दोन कर्मचारी यांचा सशस्त्र पथक गस्त घालत आहे. पुणे विभागातील सुमारे २४ महत्त्वाच्या गाड्यांमध्ये एस्कॉर्टिंग व्यवस्था आहे. निरीक्षक आपल्या कार्यक्षेत्रातील गाड्यांमध्ये गस्त घालत आहेत व स्थितीची देखरेख करत आहेत. रात्रीच्या वेळी एक निरीक्षक ड्यूटी स्टेशन कंट्रोल रूमशी समन्वय साधून परिस्थितीवर लक्ष ठेवत आहे. साध्या वेशातील विशेष पथके स्थानके व गाड्यांमध्ये माहिती संकलनासाठी तैनात आहेत.

'रेल मदत' या मंचावर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची नियमितपणे देखरेख केली जात आहे. गुप्तचर माहिती संकलनासाठी एसआयबी युनिटसोबत समन्वय साधला जात आहे. पुणे विभाग प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सदैव वचनबद्ध असून प्रवाशांना सुरक्षित प्रवासाचा अनुभव देण्यासाठी कटिबद्ध आहे, असे रेल्वे मंत्रालयाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

## विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासोबत आयुष्यातही घडवा : आयुक्त शेखर सिंह



◆ **पिंपरी (प्रतिनिधी):**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने शनिवार २६ एप्रिल रोजी निगडी प्राधिकरण येथील ग.दि. माडगूळकर सभागृहात वार्षिक स्नेह उत्सव, गुणगौरव आणि पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त शिक्षण विभाग विजयकुमार थोरात, शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीता बांगर, तसेच प्राथमिक शाळांमधील सर्व मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षण विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले, तर शालेय विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वस्तू देऊन प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांचा सन्मान केला.

मार्गदर्शनपर भाषणात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी शिक्षण क्षेत्रात अविरत काम करत राहिल्यास सर्व समस्यांना तोंड देऊ शकू असा विश्वास व्यक्त केला. 'विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासोबत आयुष्यात चांगला माणूस कसा घडेल यावर लक्ष केंद्रित करावे.' आयुक्त सिंह यांनी पुढे म्हटले की, गेल्या तीन वर्षांत शिक्षण विभागात शिक्षक आणि पालकांच्या मदतीने खूप चांगले बदल घडवून आणले आहेत. 'आजही अनेक शाळांच्या खोल्या व मैदानांच्या समस्या आहेत; परंतु येणाऱ्या पाच वर्षांत आपण असेच काम करत राहिलो तर सर्व समस्यांना तोंड देऊ शकतो,' असेही त्यांनी सांगितले. यावर्षी भोसरी, दापोडी, दिघी येथील शाळांमध्ये डान्स रूम, कला कक्ष, स्टाफ रूम अशा सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सर्व पर्यवेक्षकांनी अपेक्षेपेक्षा चांगले काम केल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. "शाळा व्यवस्थापन समितीमुळे पालिकेच्या शिक्षण विभागाच्या कामात चांगली मदत होत आहे. आपली शिक्षणाची चळव पालक समिती आणि शिक्षव मुख्याध्यापक, पालकांनी निरंत चालू ठेवली, तर आपण मोठा बद घडवू शकतो," असे त्यांनी नमू केले.

आयुक्त सिंह यांनी इय आठवी, नववी, दहावीच विद्यार्थ्यांवर अधिक लक्ष केंद्रि करण्याची गरज असल्याचे सांगितले "सक्षम हा उपक्रम आपल्या फार काळ चालवायचा नाही कार येणाऱ्या काळात मौल्यवान बद घडवणार आहोत. ६४ शाळांम कला आणि क्रीडा शिक्षक लवकर रुजू होणार असल्याचीही त्यां माहिती दिली. "लवकरच विद्यार्थ्यां एकाच छताखाली सर्व प्रकारचे खे खेळता येतील आणि लवकर यावर उपाययोजना करून का सुरू करणार आहोत," असेही त्यां सांगितले.

अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभ पाटील यांनी आपल्या भाषणात शिक्ष आणि शिक्षण विभागाचे चांगले का सुरू असल्याचे नमूद केले. "पिंप चिंचवड महापालिका चांगल्य दिशेने मार्गक्रमण करत आहे," अ त्यांनी सांगितले. यावेळी शिक्षकांच बदल्या ऑनलाइन पद्धतीने होण असल्याचे त्यांनी नमूद केलं. सार पोर्टलचा चांगल्या प्रकारे शिक्षकां उपयोग करावा अशी अपेक्षाही त्यां व्यक्त केली. "भविष्यात क्री प्रबोधिनीच्या माध्यमातून चांग खेळाडू घडवण्यासाठी महापालि प्रयत्नशील आहे आणि आंतरराष्ट्री दर्जाचे खेळाडू आपल्या शाळांत तयार होतील," अशी आशा त्यां व्यक्त केली.

सहाय्यक आयुक्त विजयकुम थोरात यांनी सांगितले की, सार पोर्टलद्वारे ८८ टक्के तक्रारी निका काढल्या आहेत आणि ३५ तक्रा प्रलंबित आहेत, ज्यांवर देखी लवकरच कारवाई होणार आहे "जून-जुलैमध्ये पवित्र पोर्टलद्व २५० ते ३०० कायमस्वरूपी शिक्ष शाळांना मिळणार आहेत," अस त्यांनी सांगितले. आयुक्त शेखर सिं हे पालिकेतील शिक्षण विभागा प्राधान्य देत मार्गदर्शन करी असल्याबद्दल थोरात यांनी त्यां आभार मानले.

# वेचक

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांनी ३० एप्रिलपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**पुणे :** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत सोयाबीन, भुईमुग व सूर्यफूल या पिकामध्ये काम करणाऱ्या शेतकरी उत्पादक कंपन्यांनी ३० एप्रिल २०२५ अखेर अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. संस्थेच्या स्थापनेला कमीत कमी ३ वर्षे पूर्ण झालेली असावी, २०० हून अधिक शेतकरी सदस्य, सरासरी ९ लाखांपेक्षा अधिक वार्षिक उलाढाल, सहकारी संस्थांसाठी उद्दिष्टांमध्ये तेलबिया संदर्भ असणे आवश्यक, शासकीय योजनांतर्गत तयार झालेल्या संस्थांना प्राधान्य. शासकीय संस्था नसल्यास तेलबिया, खाद्यतेल व बियाणे क्षेत्रात कार्यरत असलेल्या सार्वजनिक, खासगी संस्थांनाही 'मूल्य साखळी भागीदार' म्हणून काम करण्यास संधी मिळणार असून त्यांच्यासाठी वेगळे गुणांकन निकष ठेवण्यात आले आहेत. राज्यामध्ये तेलबियांच्या उत्पादनामध्ये भरघोस वाढ करण्यासोबतच खाद्यतेलाचे उत्पादन वाढवण्यासाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया राबविण्यात येत आहे. याअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांची 'मूल्य साखळी भागीदार' म्हणून निवड केली जाणार आहे. तेलबिया पिकांमधील उत्पादन वाढीसोबतच शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याचा या योजनेचा उद्देश असून जिल्ह्यातील पात्र संस्था, कंपन्यांनी संबंधित 'तालुका कृषी अधिकारी' कार्यालयास वेळेत परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केले आहे.

## पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांना भरावा लागणार दंड

**पुणे :** पुणेकरांनी पाण्याचा जपून वापर करावा यासाठी पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने आदेश दिले आहेत. पाण्याची नासाडी टाळण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने हे आदेश जारी केले आहेत. दंडात्मक कारवाईनंतर हे पाणी वाया जात असल्याचे निदर्शनास आल्यास थेट नळ तोडण्याचे आदेश पालिकेने दिले आहेत. त्यामुळे पाण्याची नासाडी करणाऱ्यांना चांगली चपराक बसणार आहे. शहरातील अनेक सोसायटी यांना स्वयंचलित पाण्याचे कॉक नाहीत परिणामी पाण्याच्या टाक्या भरल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाणी ओवर फ्लो होते. अनेक बैठकरांच्या ठिकाणी पिण्याचे पाणी बाग, वाहने धुणे, रस्त्यावर पाणी मारणे अशा गोष्टींमुळे पाण्याची नासाडी होत असल्याचे आढळून आले. त्यानंतर पुणे महानगर पालिकेकडून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. आता दंडात्मक कारवाईसोबत नळ तोडण्याची देखील कारवाई होणार आहे. पुणेकरांनो पाणी जपून वापरा कारण जर तुम्ही पाण्याचा अपव्यय कराल, तर तुमच्यावर दंडात्मक कारवाई होईल असा आदेश पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिला आहे. काही दिवसांपासून आपण जर पाहिलं तर पुणे शहरासह राज्यात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पार गेल्यामुळे पाण्याचा वापर देखील वाढला आहे. एका बाजूला राज्यातील पाणीटंचाई पाहता पुढे नगरपालिकेने हा योग्य निर्णय घेतला असावा असं तज्ज्ञांचे मत आहे. पाण्याची नासाडी टाळण्यासाठी पाणी पुरवठा विभागाने दंडात्मक कारवाईचे आदेश दिले. दंडात्मक कारवाई करूनही पाणी वाया जात असल्याचे निदर्शनास आल्यास पाणीपुरवठा विभाग नळसुद्धा तोडू शकतात. पुणे शहरातील खराडी, चंदन नगर लोहगाव, धानोरी स्वागत मोठ्या मोठ्या सोसायटीमध्ये सुद्धा पाणीटंचाई निर्माण झाली आहे. आजही अनेक जण मोठ्या प्रमाणावर पाण्याची नासाडी करतात. हेच टाळण्यासाठी पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने हा निर्णय घेतला आहे.

# महाराष्ट्राविषयी काश्मिरी युवक कृतज्ञ

## महाराष्ट्रात घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग काश्मिरी जनतेसाठी करणार

◆ **पुणे (प्रतिनिधी):**

सरहद, पुणेच्या माध्यमातून काश्मीरमधील अनेक विद्यार्थी शिक्षणाच्या निमित्ताने महाराष्ट्रात मुख्यत्वे करून पुण्यात राहत आहेत. महाराष्ट्रातील जनतेशी आमचे स्नेहबंध जोडले गेले आहेत. महाराष्ट्राविषयी आम्हाला आपुलकी आहे. महाराष्ट्रातून काश्मीरमध्ये परतलेल्या विद्यार्थ्यांनी पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर तेथे अडकलेल्या मराठी पर्यटकांना मानसिक आधार देत त्यांची काळजी घेतली. महाराष्ट्रात शिकलेला काश्मिरी युवकवर्ग आपल्या ज्ञानाचा उपयोग काश्मीरमधील विद्यार्थ्यांसाठी करू इच्छित आहे. ज्या योगे त्यांना काश्मीर पलीकडील भारताची मुख्यत्वे करून महाराष्ट्राची माहिती होईल. त्यांना प्रमुख प्रवाहाशी जोडण्याची चळवळ उभी केली जाईल. दहशवादी हल्ल्यानंतर या युवकांमध्ये अस्वस्थता आहे. भारतातील काही ठिकाणी काश्मीरमधून शिकायला गेलेल्या विद्यार्थ्यांवर हल्ले झाले आहेत या पार्श्वभूमीवर काश्मीरमधील पुण्यात शिकलेल्या विद्यार्थ्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

अर्हम संस्थेचे प्रमुख डॉ. शैलेश पगारिया, सरहद, पुणेचे समन्वयक लेशपाल जवळगे तसेच अकीब भट (आरागाम), मंझूर बशीर (बांदिपोरा) यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी महम्मद शफी (बडगाम), गुलशन काद्री, दिलबर खोजा (कुपवाडा), मारिया गुलजार (गंदेरबल), असिफ डर हे काश्मिरी युवक उपस्थित होते. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्याचा निषेध करीत मृत पर्यटकांना श्रद्धांजली वाहून काश्मिरी युवकांनी माध्यमांशी संवाद साधत आपली भूमिका स्पष्ट केली.




पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर देशाच्या विविध भागात शिक्षण-व्यवसायानिमित्त असलेल्या काश्मिरी तरुणांना धमकावले गेल्याच्या घटना घडल्या आहेत. पुण्यातही असे किरकोळ प्रकार झाल्यानंतर पोलीस आयुक्तांची भेट घेऊन परिस्थितीविषयी अवगत केले जाणार आहे. मात्र आमची कोणाविरुद्ध तक्रार नाही. पोलिसांनी आम्हाला सदैव मदत केली आहे. त्या बद्दल त्यांचे आभारही मानणार आहे, अशी माहिती देऊन अकीब भट म्हणाले, सरहद संस्थेशी आम्ही जोडले गेलो असून याच माध्यमातून पुण्यातून शिक्षण घेऊन परत काश्मीरमध्ये गेलेल्या विद्यार्थ्यांनी दहशतवादी हल्ल्यानंतर पर्यटकांची काळजी घेतली. या मागचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील जनता आणि काश्मिरी युवक यांच्यात भावबंध जुळलेले आहेत. पुण्यात घेतलेल्या शिक्षणाचा वसा आम्हाला काश्मीरमधील पुढच्या पिढीकडे पोहोचवायची इच्छा आहे.

मंझुर बशीर म्हणाले, महाराष्ट्रातील वास्तव्यामुळे मला मराठी भाषा समजते आणि बोलताही येते. मी काही मराठी चित्रपटांमध्येही काम केले असून नृत्य दिग्दर्शनही करत आहे. यातून माझा पुणे-मुंबईतील मराठी माणसांशी स्नेहबंध जुळला आहे. सरहद, पुणेच्या माध्यमातून मला मिळालेल्या शिक्षणाने माझ्यातील आत्मविश्वास व सकारात्मकता वाढीस लागली आहे. मी स्वतः काश्मीरमधील दहशतवादाने पीडित आहे. आम काश्मिरी जनता दहशतवाद्यांचा नेहमीच विरोध करत आली आहे. काश्मीरमधील पर्यटन बंद पाडून तेथील आर्थिक व्यवहार ठप्प होणे आम्हाला योग्य वाटत नाही. तसेच आम्ही घेतलेले शिक्षण सरदह संस्थेच्या माध्यमातून जम्मू-काश्मीरमधील आमच्या मूळ गावातील विद्यार्थ्यांना देऊन त्यांनाही आत्मविश्वासू व स्वयंपूर्ण बनविण्याचा आमचा मानस आहे.

# जिजाऊ रथयात्रेचे उद्या शहरात होणार जोरदार स्वागत

◆ **पिंपरी ( प्रतिनिधी):**

मराठा सेवा संघाच्या वतीने मराठा जोडो अभियान अंतर्गत जिजाऊ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही रथयात्रा बुधवारी ३० एप्रिल रोजी पिंपरी चिंचवड शहरात दाखल होत आहे. या रथयात्रेचा मुख्य उद्देश सामाजिक समता व




सलोखा निर्माण करणे, संविधानाचे महत्त्व समाजास पटवून देणे, मराठा बहुजन समाजात जागृती निर्माण करणे. सध्या जातीयवाद, धर्मवाद, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, धार्मिक आणि राजकीय उन्माद यासह अनेक कारणांनी सामाजिक एकता, सलोखा धोक्यात आला आहे. समाजा-समाजामध्ये संशयाचे व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी शेतकरी, कामगार, युवक, युवती, विद्यार्थी तसेच समाजातील सर्वच घटकांशी संवाद साधून राष्ट्र उभारणीच्या कार्यात सामाजिक ऐक्याचा जागर करण्यासाठी मराठा सेवा संघाच्या वतीने जिजाऊ रथयात्रेच्या माध्यमातून मराठा जोडो अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेश महासचिव सौरभ खेडेकर व मराठा सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक अर्जुन तनपुरे यांच्या नेतृत्वात सदर रथयात्रेची सुरवात १८ मार्च रोजी भोसले गढी, वेरूळ येथून झाली आहे. महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यातून हजारो किलोमीटरचा प्रवास करून ही रथयात्रा बुधवारी ३० एप्रिल रोजी पुणे जिल्ह्यात येत आहे. बुधवार दि. ३० एप्रिल २०२५ रोजी दुपारी तीन वाजता जिजाऊ रथयात्रा डांगे चौक थेरगाव येथे येणार आहे. यावेळी मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व शहरातील विविध सामाजिक संघटनांच्या वतीने रथयात्रेचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात येणार आहे. ही रथ यात्रा पूर्ण शहरात फिरणार असून स्वागत व जिजाऊंना अभिवादन करण्यासाठी डांगे चौक येथे दुपारी ३ वाजता खासदार श्रीरंग आप्पा बारणे,आमदार शंकर जगताप, माजी नगरसेवक राहुल कलाटे तसेच दुपारी ३.३० वा. चाफेकर चौक चिंचवड येथे विधान परिषद आमदार उमा खापरे,माजी नगरसेवक सुरेश भोईर,राजेंद्र गावडे, अनंत कोऱ्हाळे, अश्विनी चिंचवडे याचप्रमाणे सायं. ४.१५ वाजता पेट्रोल पंपाजवळ, चिंचवड स्टेशन येथेआमदार अमित गोरखे, माजी नगरसेवक मारुती भापकर, शरद थोरात यांच्या उपस्थितीत रथ यात्रेचे स्वागत व जिजाऊंना अभिवादन करण्यात येणार आहे.

नंतर रथयात्रा मोरवाडी अजमेरा मार्गे सायंकाळी ५ वाजता नेहरूनगर येथे येणार आहे.

# आ. अमित गोरखे यांचे पिंपरी मतदारसंघात 'वस्ती चलो संपर्क' अभियान



◆ **पिंपरी( प्रतिनिधी):**

भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात २६ एप्रिल व २७ एप्रिल या दिवशी 'गांव /वस्ती संपर्क अभियान' राबविण्याच्याबाबत पक्षाचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या माध्यमातून देण्यात आल्या होत्या. याप्रसंगी आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी विधानसभा मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने वस्ती चलो संपर्क अभियान राबविण्यात आले असून दापोडी फुगेवाडी कुंदन नगर सिद्धार्थ नगर संजय नगर गणेश नगर सुंदर बाग कॉलनी, एसटी वर्कशॉप, या भागामध्ये प्रामुख्याने या अभियान राबविण्यात आले.

यावेळी स्वच्छता अभियान देखील राबविण्यात आले तसेच मतदार संघातील नागरिकांसोबत मन की बात कार्यक्रम पाहिला असून संपर्क अभियान अंतर्गत परिसरातील विठ्ठल मंदिर परिसरातील स्वच्छता केली प्रभागातील लाभार्थी नागरिकांची घरोघरी जाऊन भेट घेतली तसेच प्रभागांमध्ये राहत असलेले कारसेवक नंदकिशोर कणसे, महेश दाभोळकर, दत्तात्रय गायकवाड, शशिकांत देशपांडे, दादासाहेब ढवाण, जनाभाऊ पेडणेकर, व आणीबाणीतील सुभाष बोधे या सर्व नागरिकांच्या घरी जाऊन भेट घेतली व त्यांचा सन्मान केला. तसेच प्रभागातील लाभार्थी संध्या जिजाऊ पवार व इतर नागरिकांच्या घरी भेट दिल्या.

# महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी घेतली सेवा हक्क दिनानिमित्त शपथ

◆ **पिंपरी (प्रतिनिधी ):**

आम्ही गांभीर्यपूर्वक शपथ घेतो की, आम्ही महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत शासनाच्या सेवा पारदर्शक पद्धतीने विहित कालमर्यादेत व सौजन्याने पात्र नागरिकांना देण्याकामी आम्हाला सुपूर्द करण्यात आलेली जबाबदारी पूर्ण प्रामाणिकपणे, निष्ठेने, सचोटीने, संवेदनशीलतेने व तत्परतेने पार पाडण्यासाठी कटिबद्ध राहू. आम्ही सेवा वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही यासाठी आवश्यक ती पावले उचलू तसेच आम्ही नागरिकांना उक्त कायद्याने प्रदान केलेल्या सेवेच्या हक्कांचा आदर ठेवून व सेवा भाव ठेवून त्यांच्या हितार्थ व कल्याणार्थ काम करू अशा आशयाची शपथ आज महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली घेतली.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सेवा हक्क दिन व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या दशकपूर्ती निमित्त महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



यामध्ये आज प्रशासकीय भवनात महानगरपालिका कर्मचाऱ्यांमध्ये आपल्या सेवा हक्का हक्काबाबत जागरूकता निर्माण व्हावी याकरिता महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लोकसेवा सेवा हक्काची शपथ घेतली. यावेळी उप आयुक्त विठ्ठल जोशी, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, प्रशासन अधिकारी श्रद्धा बोर्डे, कर्मचारी महासंघाचे उमेश बांदल, मुख्य लिपिक मोरे, अनिल कुऱ्हाडे यांच्यासह महानगरपालिका कर्मचारी उपस्थित होते.

राज्यातील नागरिकांना सर्वोत्तम सेवा सुविधा देण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने राज्यात आज (२८ एप्रिल) रोजी सेवा हक्क दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या आनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सेवा हक्क दिन व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या दशकपूर्तीनिमित्त आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार प्रशासन सेवेत नागरी सहभाग वाढविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये उपक्रमांमध्ये मुख प्रशासकीय कार्यालयांसह, क्षेत्री कार्यालये तसेच इतर कार्यालयांम सेवा हक्क दिनानिमित्त सेवे बांधिलकी जपणूक करण्याची शप अधिकारी वर्गाना देण्यात आली आहे दरम्यान महापालिकांच्या सर्व क्षेत्री कार्यालयांचे आरोग्य विभागामार्फ गर्दीच्या ठिकाणी, पर्यटन स्थळे तीर्थक्षेत्रे येथे सेवा हक्क नियमां फलक घेऊन जनजागृती करण्या येत आहे. शहरातील नागरि भागांमध्ये पथनाट्याद्वारे सेवा तसे समाज विकास विभागाच्या वती झोपडपट्टी व बचत गट यांच्याम समूह संघटकामार्फत सेवा हक्क अधिनियमाची माहिती देण्यासा मेळावे व बैठकांचे आयोज करण्यात आलेले आहे.

> लोकसेवा हक्क दिन साजरा करताना आपण अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महापालिकेत येणाऱ्या नागरिकांना सर्वोत्तम सेवा देण्याचा संकल्प करून आपल्या नागरिकांना सेवा देण्यासाठी सदैव तयार राहू. आजच्या लोकशाही सेवा हक्क दिनानिमित्त नागरिकांना सर्वोत्तम सेवा देण्याची शपथ घेऊन पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेला देशात नंबर एक बनवूया.

### अभिनेते संकर्षण कऱ्हाडे यांचे मत

# प्रेक्षक, श्रोते ही माझी खरी श्रीमंती

◆ **पुणे (प्रतिनिधी):**

माझ्या नाटकाचा प्रयोग असला की, मी त्या नाट्यगृहाच्या खिडकीवर जाऊन तिकीट विकण्याचा आनंद मी घेतो. एकमेकांना वेळ न देण्याच्या जमान्यात पाचशे रुपये खर्च करून, गजरा माळून परभणीच्या मुलाचे नाटक पाहायला रसिक मायबाप तीन तास खर्ची घालतात. हे प्रेक्षक आणि श्रोते ही माझी खरी श्रीमंती आहे, असे मत चतुरस्त्र अभिनेते आणि कवी संकर्षण कऱ्हाडे यांनी व्यक्त केले.




द. मा. मिरासदार यांच्या जन्मदिनानिमित्त गेल्या दोन वर्षांपासून द. मा. मिरासदार प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी दिला जाणारा सोमवारी चतुरस्त्र अभिनेते आणि कवी संकर्षण कऱ्हाडे यांना प्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

प्रकट मुलाखतीद्वारे संवाद साधला, त्यावेळी कऱ्हाडे बोलत होते.

१४ एप्रिल हा द. मा. मिरासदार यांचा जन्मदिवस आहे. द. मा. मिरासदार हे कथालेखक, चित्रपटकथा व संवाद लेखक, कथाकथनकार होते. तसेच सुमारे २६ वर्षे ते अभाविपचे अध्यक्ष व लोकप्रिय प्राध्यापकही होते. अनेक विविध सामाजिक आणि कलाक्षेत्रातील उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग असायचा. त्यामुळे हा पुरस्कार त्यांच्याशी संबंधित असलेल्या क्षेत्रात त्यांचा वारसा पुढे नेणाऱ्या तरुण कलाकारास द. मा. मिरासदारांच्या नावाने देण्यात येतो. मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी मानपत्राचे वाचन सुनेत्रा मंकणी मंडळाच्या राजवाडे सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर वसंत मिरासदार, हरीभाऊ मिरासदार, प्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते रवींद्र मंकणी, सुनेत्रा मंकणी आणि प्रसाद मिरासदार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना संकर्षण कऱ्हाडे म्हणाले की, बँकेची नोकरी सांभाळून माझे वडील रात्री नाटकांचे प्रयोग करायचे. अभिनयाच्या त्या जादूने वयाच्या अगदी सुरुवातीच्या काळात माझ्या मनाचा ताबा घेतला. त्याचवेळी अभिनय क्षेत्रात करिअर करायचे, हे मी निश्चित केले होते. मुंबईत आल्यावर सुरुवातीला जो संघर्ष करावा लागतो, तो संघर्ष मी परभणीतून मुंबईत आल्यावर करावा लागला नाही. त्यामागे आई-या क्षेत्रात ज्या विषयाला संघर्ष म्हटले जाते, त्याला मी या क्षेत्रातील बाय प्रॉडक्ट संबोधतो. कारण तुम्हीच या क्षेत्राची निवड केलेली असते. मुंबईने मला वेळेचे महत्त्व शिकवले आणि जगण्याला गती दिली. मला कवी म्हणून संबोधले जाते, पण मी आजही स्वतःला कवी म्हणत नाही. कवितेचे शास्त्र, तंत्र आणि मीटर आजही मला कळत नाही. कुठल्याही घटनेवरची पहिली प्रतिक्रीया मी शब्दात मांडतो आणि लोक त्याला कविता म्हणतात, हा लोकांचा मोठेपणा आहे. आई-वडिलांच्या संस्कारांमुळे माझे पाय कायम जमिनीवर राहतात. मी जोपर्यंत या क्षेत्रात काम करेल, तो पर्यंत मी माझी हीच वृत्ती आणि नम्रता कायम ठेवेल. असे



पुरंदर येथील शेतकऱ्यांनी विमानतळाला विरोध करण्यासाठी जिल्हाधिकारी

# बेस्ट सुदृढ होणे, ही मुंबईकरांची गरज

मुंबई महापालिकेने बेस्टच्या भाडेवाढीला मंजुरी दिली असून यामुळे बेस्टला ५९० कोटी रुपयांचा वार्षिक महसूल प्राप्त होणार आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि या शहराला प्रवाशांच्या सेवा पुरवणाऱ्या बेस्टचे भाडे मात्र किरकोळ असे होते. जास्तीत जास्त भाडे २० रुपये होते. त्यामुळे प्रवाशांची चंगळ होत असली तरीही ही विलक्षण सेवा डबघाईला आली होती. त्यामुळे आता बेस्टने प्रवासी भाडेवाढ केली आहे आणि ज्यामुळे किमान भाडे दहा रुपये होणार आहे. तरीही मुंबईची आर्थिक स्थिती आणि मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे ही बाब लक्षात घेता ही भाडेवाढ काहीच नव्हे. २०१९ मध्ये बेस्टने किमान भाडे पाच रुपये केले होते आणि त्यामुळे बेस्टच्या बसेसमध्ये खचाखच गर्दी होत होती. बेस्टचे एसव्हीआर श्रीनिवास यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये भाडेवाढीचा प्रस्ताव मांडला आणि त्याला महापालिकेने मंजुरी दिली.

बेस्ट ही मुंबईकरांची दुसरी लाईफलाईन म्हटली जाते आणि दररोज ३१ लाख प्रवाशांना ती वाहून नेते. बेस्टच्या ताफ्यात २१८६ बसेस आहेत आणि त्यापैकी ८४७ या बेस्टच्या स्वतःच्या मालकीच्या आहेत. भाडेवाढीमुळे बेस्टचा महसूल १४०० कोटी रुपयांनी वाढणार आहे अशी अपेक्षा आहे. कोणतेही सोंग आणता येते पण पैशाचे सोंग आणता येत नाही. त्यामुळे बेस्टची परिस्थिती डबघाईला आली असताना बेस्टची अवस्था 'खिशात नाही आणा आणि मला बाजीराव म्हणा' अशी झाली होती. बेस्टला सातत्याने मुंबई महापालिकेकडे भाडेवाढ करण्याची मागणी करावी लागत होती आणि बेस्ट उपक्रमाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. जरी या भाडेवाढीमुळे मुंबईकरांच्या खिशाला झळ बसणार आहे तरीही हा निर्णय आवश्यकच होता, कारण मुंबईकर काही इतके गरीब नाहीत की बेस्टची थोडी भाडेवाढ ते सहन करू शकत नाहीत. बरेच दिवसांपासून भाडेवाढीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पडून होता. अखेर त्यास मंजुरी देण्यात आली आणि बेस्टचा भाडेवाढीचा मार्ग मोकळा झाला आहे. अर्थात बेस्टने तिकीटात भाडेवाढ केली असली तरीही सवलतीच्या दरात कुठलीही वाढ केलेली नाही. हा त्यातल्या त्यात दिलासा आहे.

गेल्या आठवड्यात बेस्टने भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव दिला असताना शिवसेना उबाठाने या मुद्यावर राजकारण सुरू केले आहे. शिवसेना उबाठाच्या कार्यकर्त्यांनी रास्ता रोको केले. वास्तविक शिवसेना उबाठाच्या हातात महापालिकेची सत्ता इतकी वर्षे होती. पण शिवसेना (उबाठा)ने कधीही बेस्टला गर्तेतून वर आणण्याचे प्रयत्न केले नाहीत. शिवसेना युवानेते तर सातत्याने नाईटलाईफच्या प्रस्तावात मग्न होते. पण बेस्टला संकटातून बाहेर काढण्याचे त्यांना कधीही सुचले नाही. आता मात्र राज्यातील सत्ता हातातून गेल्यावर त्यांना प्रवाशांचा कळवळा आला आहे आणि हा कळवळा किती खोटा आहे ते समजतेच. राज्य सरकारवर शिवसेना उबाठा गटाने आरोप करण्याचे सुरूच ठेवले आहे, पण जनता दुधखुळी नाही. इतके दिवस शिवसेना उबाठाच्या हातात बेस्ट असताना तिचे किती कल्याण केले हा विचार जनतेच्या मनात येतोच. सहा वर्षे बेस्टच्या प्रवाशांनी अल्प दरात प्रवास एन्जॉय केला. त्यामुळे आता थोडी खिशाला तोशिस पडली तरी ते मुंबईकरांच्या हिताचेच आहे. याबरोबरच बेस्टने आपली सेवा अद्ययावत करण्यासाठीही प्रयत्न करायला हवेत.

गेल्या कित्येक वर्षांत बेस्टच्या ताफ्यात नवीन बसेसची भर पडली नाही. कित्येक बसेस कमी करण्यात आल्या आहेत आणि इलेक्ट्रिक बसेस अजून पुरेशा म्हणाव्या तशा आणल्या नाहीत. त्यामुळे नाईलाजाने बेस्टला भाडेवाढ करावी लागली आहे. काही तज्ज्ञांनी तर अशी मागणी केली आहे की जोपर्यंत बेस्टच्या ताफ्यात नव्या ५०० बसेस आणल्या जात नाहीत तोपर्यंत आम्ही कोणत्याही प्रकारच्या भाडेवाढीला विरोध करू. असे म्हणणे सोपे आहे, पण प्रत्यक्षात ते अत्यंत अवघड आहे. विरोधक आता बोंब मारतील की सरकारने निवडणुका झाल्या की भाडेवाढ केली आहे, पण ज्यांना इतिहासाची माहिती आहे आणि बेस्टच्या हालाखीची माहिती आहे त्यांना हे पटेल की बेस्टने किती तरी वर्षांत भाडेवाढ केलीच नाही. त्यामुळे ही बेस्टची भाडेवाढ आता अपरिहार्य झाली आहे. तुम्ही किती काळ न पेलणारे ओझे घेऊन चालत रहाणार याला काही मर्यादा असते. बेस्टने ती मर्यादा कधीचीच ओलांडली आहे. त्यामुळे आता भाडेवाढ करण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे. जरी कितीही भाडेवाढ झाली तरीही बेस्ट ही मुंबईकरांसाठी योग्य वाहतूक व्यवस्था आहे.

लोकल ट्रेनच्या खालोखाल मुंबईचे दररोज ३१ लाख प्रवासी बेस्टने ये-जा करतात. त्यामुळे बेस्टशिवाय लोकांना पर्याय नाही. तोट्यात महामंडळ गेले आहे आणि तरीही अजूनही बेस्टने यातून मार्ग शोधले नाहीत, तर हे जड ओझे घेऊन चालण्याचे कुणालाच जमणार नाही. बेस्टच्या इतिहासात ही पहिलीच भाडेवाढ नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी सरकार असताना कितीतरी वेळा भाडेवाढ झाली आहे. पण त्यावेळी गप्प असलेले विरोधक आता मात्र भाडेवाढ झाल्यावर ओरडत आहेत हे त्यांचे अज्ञान मूलक आहे. कारण बेस्ट हा पांढरा हत्ती आहे आणि तो किती काळ पोसायचा याला काही मर्यादा आहेत. पण आपली राज्यव्यवस्था ही लोकशाही असल्याने सरसकट बेस्ट बंद करता येत नाही आणि प्रवाशांना परवडणाऱ्या दरातच प्रवास सेवा उपलब्ध करून देणे राज्य सरकारवर जबाबदारी येते. त्यामुळे ही भाडेवाढ झाली तर ती स्वीकारणे योग्य राहील. कारण दुसरा काहीच उपाय नाही. जे विरोधक आज बोंब मारत आहेत की भाडेवाढ करू नका त्यांच्याकडे दुसरे काही उपाय असतील तर त्यांनी सांगावेत. पण तसे ते करणार नाहीत. बेस्टची भाडेवाढ प्रस्तावित आहे. अजून झालेली नाही. पण ती स्वीकारणे योग्य आहे.

# ही भारतासाठी सुवर्णसंधीच ...

अमेरिकेच्या अध्यक्षांकडून नवनवीन धोरणांचा धडाका उडवला जात असताना जागतिक बाजारात तसेच जनमानसात उठणारी आंदोलने अधिकाधिक तीव्र होत आहेत. अमेरिकेला पूर्वीची श्रीमंती मिळवून देण्यासाठी ट्रम्प महाशयांनी तेथील परदेशी व्यक्तींना येनकेन प्रकारे देशाबाहेर घालवण्यासाठी अनेक वाटा-पळवाटा शोधल्या. यातून अनेक उच्चपदस्थही सुटणार नाहीत. मात्र भारताने या सुवर्णसंधीचा लाभ उठवायला हवा.

सध्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील आयातीवर मोठ्या प्रमाणात शुल्क लावून जागतिक व्यापारावर तसेच जागतिकीकरणावर हल्ला चढवला आहे. भारतातील सर्व प्रसारमाध्यमे, राजकारणी तसेच तथाकथित बुद्धिवादी अमेरिकेने सुरू केलेल्या या आर्थिक युद्धाची झळ आपल्याला कितपत बसेल यावर काथ्याकुट करत आहेत; परंतु याच वेळी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी अमेरिकेतील संपूर्ण शिक्षणपद्धती, तेथील संशोधन संस्था या सर्वांवर हल्लाबोल करुन परकीय विद्यार्थ्यांचे अमेरिकेत येणे अशक्यप्राय करून सोडले आहे. आपल्या वंशाचे अनेक नागरिक तंत्रज्ञान क्षेत्रात परदेशी उच्च पदांवर असल्याचा अभिमान भारतीय लोक बाळगतात; परंतु गेल्या ६०-७० वर्षांपासून प्रतिभासंपन्न भारतीय, शास्त्रज्ञ आपल्या देशातून पलायन करून अमेरिका व इतर प्रगत राष्ट्रांमध्ये जाऊन त्यांची अर्थव्यवस्था बळकट करत आहेत, याकडे आपण पूर्णपणे कानाडोळा करत आहोत.

येत्या एक ते दोन वर्षांमध्ये आपण मानवासह पहिले अंतरिक्षयान पाठवण्याचे मनसुबे रचत आहोत. त्याच वेळी गेल्या तीन वर्षांपासून चीनने अवकाशात आपला तळ उभारला आहे, तसेच चीनी अंतरिक्षयात्री नियमितपणे तेथे ये-जा करत असतात. अंतरिक्ष तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपण चीनपेक्षा वीस वर्षे मागे आहोत. पण १९६० च्या दशकात ही स्थिती अगदी वेगळी होती. त्यावेळी भारत हा एकमेव आशियाई देश होता, ज्याने स्वतः रचना तसेच संशोधन करून स्वदेशी बनावटीचे 'मारुत' हे विमान तयार केले होते. त्यावेळी तंत्रज्ञानाच्या सर्व क्षेत्रांमध्ये चीन आपल्यापेक्षा किमान दहा वर्षे मागे होता; परंतु १९६० च्या दशकात माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये प्रामाणिक सरकार होते. त्याने अमेरिकेतील चीनी नागरिकांना तसेच तंत्रज्ञांना मायदेशात परतण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देऊन अमेरिकेच्या नामवंत विद्यापीठांमधील शास्त्रज्ञ तसेच तंत्रज्ञ चीनला परत आले. अंतरिक्षात चीनच्या प्रगतीचा पाया या परदेशातून परत आलेल्या चीनी नागरिकांनीच घातला.

याउलट भारताची स्थिती होती. दरवर्षी भारताच्या उच्चतंत्र शिक्षणसंस्थांमधून शिक्षित झालेले ६० ते ७० टक्के तज्ज्ञ या काळात अमेरिकेची वाट धरत होते. या स्थितीला दोन बाबी जबाबदार होत्या. आपल्या देशात संशोधनाच्या आणि कामाच्या पुरेशा संधी उपलब्ध नव्हत्या. दुसरे म्हणजे संशोधनक्षेत्रातील व्यक्तींना अत्यंत तुटपुंजे आर्थिक पाठबळ मिळत असे. काही अपवाद



वगळता भारतातील मोठमोठे उद्योजक परदेशातून तंत्रज्ञान आयात करून त्या आधारे उत्पादनावर भरघोस नफा मिळवण्यातच धन्यता मानत. इतर देशांप्रमाणे संशोधन क्षेत्रात खासगी गुंतवणूक अत्यंत कमी आहे. त्यातच सरकारनेही हात आखडता घेतल्याने आयआयटीसारख्या संस्थांमधून बाहेर पडलेले प्रतिभावान मनुष्यबळ अमेरिकेतच स्थायिक झाले. किंबहुना, 'अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेसाठी कुशल तंत्रज्ञ पुरवणारी संस्था' असेच आयआयटीचे नाव झाले.

**अनिल आठल्ये**
निवृत्त कर्नल, ज्येष्ठ अभ्यासक

परदेशातून आलेल्या तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञांच्या बळावर अमेरिकेची भरभराट झाली; परंतु अमेरिकेतील गोऱ्या लोकांना या सर्व बदलामध्ये आर्थिक झळ पोहोचली. म्हणूनच त्यांनी ट्रम्प यांना भरघोस मते देऊन सत्तेवर आणले. दूरदृष्टी नसणारे ट्रम्प सरकार वेगवेगळे कायदे करून अमेरिकास्थित ग्रीनकार्डधारक भारतीयांचे जगणे कठीण करत आहे. आता अशा अवस्थेत अनेक भारतीय मायदेशी परतण्याची संधी शोधत आहेत. परकीय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मदतीवर कुऱ्हाड टाकल्यामुळे या वर्षीपासून उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाणाऱ्या लोकांचा लोंढा जवळपास थांबला आहे. बहुतांश प्रतिभावान पण मध्यमवर्गीय विद्यार्थी केवळ या भरघोस शिष्यवृत्त्यांमुळेच अमेरिकेकडे आकृष्ट होत असत. अर्थातच धनाढ्य लोक आणि राजकारणी वशिलेबाजी करुन पाल्यांना 'पेमेंट सीट'वर अमेरिकेत पाठवत असत; परंतु अमेरिकेतील एकूण विद्यार्थीसंख्येमध्ये यांचे प्रमाण बरेच कमी होते. अमेरिकेला जाण्याचा रस्ता बंद झाल्यामुळे इच्छा नसूनही अनेक प्रतिभावान शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ भारतात संधीच्या शोधात आहेत. पण गेल्या अनेक वर्षांपासून संशोधन आणि उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात निधी देण्याबाबत सरकारने हात आखडता घेतला आहे. त्यातच भारतातल्या 'बाबू राज्या'मध्ये संशोधनासाठी लागणाऱ्या उपकरणांवर जीएसटीचाही भार टाकला गेला आहे. एकीकडे सरकारी अनुदानानेच सरकारी प्रयोगशाळांसाठी खरेदी केलेल्या वस्तूंवर सरकार कर लादून पैसा एका खिशातून दुसऱ्या खिशात टाकत आहे. परिणामी शास्त्रज्ञांना संशोधनाऐवजी गुंतागुंतींचे नियम आणि उपकरणे मिळवण्यातच वेळ दवडावा लागतो.

मोदी सरकारने इतर अनेक चांगल्या गोष्टी केल्या हे निर्विवाद... परंतु सरकारी 'लाल फितीचा कारभार' तसेच 'इन्स्पेक्टर राज'ला त्यांना धक्का लावता आलेला नाही. याची काही साधी उदाहरणे म्हणजे गेल्या ७०-७५ वर्षांमध्ये केवळ चार-पाच भारतीयांनाच नोबेल पुरस्कार मिळाला आहे. त्यातही हरगोविंद खुराणांपासून व्यंकी रामकृष्ण यांच्यापर्यंत सर्वच्या सर्व भारताबाहेरच काम करत होते. दुर्दैवाने आपल्या अर्थखात्यावर कारकुनी वृत्तीचा जबरदस्त पगडा आहे. त्यामुळे शास्त्र आणि तंत्रज्ञान यातील संशोधनावर झालेला खर्च अनाठायी आहे, अशी धारणा दिसते.

ही परिस्थिती बदलायची असेल तर उद्योगधंदे उभारायला 'एक खिडकी योजना' सारखे कार्यक्रम राबवले जाण्याची तसेच संशोधनासाठीही काही योजना राबवण्याची गरज आहे. एक तीन कलमी कार्यक्रम लवकरात लवकर अमलात आणण्याचीही गरज आहे. यातील पहिला मुद्दा म्हणजे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळच्या वेळी दिली जावी आणि संशोधनासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या दुप्पट केल्या जाव्यात. या सर्वांसाठी लागणारा निधी आयआयटी किंवा आयसरसारख्या महत्त्वाच्या संस्थांना वेळेवर दिला जावा. संशोधनासाठी मंजूर झालेला निधी काही कारणांमुळे ३१ मार्चपर्यंत खर्च न झाल्यास आपोआपच पुढील वर्षापर्यंत मुदतवाढ मिळावी. ही काही नवी बाब नाही. वाजपेयींच्या काळात संरक्षण तसेच इतर क्षेत्रातील संशोधनाबाबत अशाच प्रकारचे नियम आखले गेले होते; परंतु यूपीए सरकार आल्यावर ही चांगली सुधारणा रद्द केली गेली आणि ३१ मार्चपर्यंत खर्च न झालेला निधी सरकारजमा करुन अर्थसंकल्पात शिल्लक दाखवण्यात अर्थमंत्री धन्यता मानू लागले.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नव्या प्रणालीनुसार स्वयंपूर्णतेच्या नावाखाली संशोधनासाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदीही केंद्रीयकृत केली गेली आहे. देश आत्मनिर्भर असावा आणि गरज नसताना आयात केली जाऊ नये, हा उद्देश स्तुत्य आहे; परंतु संशोधनासाठी लागणारी उपकरणे किंवा वस्तू सर्वसाधारण व्यापारात बसत नाहीत. उदाहरणार्थ, संशोधनासाठी लागणारी काही रसायने ९९ टक्के शुद्ध असावी लागतात. जगभरात याची मागणी जेमतेम १००-२०० किलोग्राम असते. त्यामुळे अशा प्रकारची खास रसायने वा उपकरणे तयार करणारे उद्योग जगात हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच आहेत. त्यांच्याकडून आयात करण्याखेरीज पर्याय नाही. खेरीज केवळ वर्षाला १०-१५ किलो लागणारी रसायने बनवण्यासाठी कोणी कारखानाही उभा करु शकत नाही. संशोधनासाठी लागणाऱ्या उपकरणांचे तसेच पदार्थांचे हे विशेष लक्षात घेऊन या वस्तूंच्या खरेदीचे केंद्रीकरण करणे चुकीचे आहे. म्हणूनच सध्याची ही व्यवस्था बंद करुन आयआयटी सारख्या संस्थांच्या संचालकांना हा निर्णय घेण्याची अनुमती दिली जावी. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे शास्त्रज्ञांनी शंभर रुपयांचे एखादे उपकरण घेण्याची अनुमती मागितली की लालफितीच्या खाक्यानुसार २५ टक्के कमी करुन संमती दिली जाते. थोडक्यात सांगायचे तर, संपूर्ण हत्तीची गरज असताना तीन चतुर्थांश हत्ती द्यायचा, असा हा खाक्या आहे. ही लाल फित कापण्याची सर्वाधिक गरज आहे.

युरोपमधील अनेक देश आणि ऑस्ट्रेलिया, न्युझिलंडसारख्या देशांमध्ये अमेरिकेच्या या धोरणामुळे तेथून भारतीय वंशाचे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ पलायन करणार हे गृहीत धरून आधीच त्यांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या सवलती जाहीर केल्या आहेत. मात्र भारत याबाबत अजूनही उदासीन आहे. १९६० च्या दशकाप्रमाणे यावेळीही आपली ही गाडी चुकणार का, हा प्रश्न आहे.

# लिंक मिडल ईस्ट कंपनी, दुबई

श्रुती गोखले यांचा जन्म एका बाळबोध, मध्यम वर्गीय घरात, कुलकर्णी कुटुंबात पुण्यात झाला. आईला शिक्षणाची खूप आवड होती, पण तो काळ, बायकांचे जग म्हणजे स्वयंपाक घर, रिती रिवाज, हौसमौज म्हणजे सणवार साजरे करणे असा होता. घरात मुलगा-मुलगी हा भेदभाव कायम होता. त्यावेळी लोहगाव विमानतळावर विमानांचे प्रदर्शन होते. ५ रुपये तिकीट होते. त्यांना विमानांचे जबरदस्त वेड होते. पण वडील म्हणाले, तू कशाला येतेस. तू थोडीच बसणारेस विमानात? याला उपयोग होईल आणि ते भावाला घेऊन प्रदर्शन बघायला गेले. त्यावेळी आई सहजपणे म्हणाली 'काय माहीत पुढे भविष्यात हीच विमानात पहिली बसेल आणि तुम्हालाही घेऊन जाईल! आणि खरोखर नकळत बोलून गेलेले तिचे शब्द खरे ठरले. त्याचवेळी त्यांच्या मनावर नकळत कोरले गेले की खूप शिक्षण घ्यायचे आणि जीवनात काहीतरी वेगळे करून दाखवायचे. आईने प्रोत्साहन दिले. शालेय शिक्षण पूर्ण करून Greaves Cotton मध्ये नोकरीही लागली आणि वडिलांनी लग्न ठरवून टाकले. त्या कुलकर्ण्यांची गोखले झाल्या. सासुबाई, पती जयंत सुधारणावादी होते. त्यांनी सासूबाईंना सांगितले की, मला पुढे शिकायची इच्छा आहे, MCom करायचे आहे, त्या म्हणाल्या, तू खुशाल तुला पाहिजे तेवढे शिक.



श्रुती गोखले

त्याचवेळी त्यांच्या पतींना ओमानमध्ये नोकरीची संधी चालून आली. आठ महिन्यानंतर त्याही ओमानला गेल्या. तिथ एक दिवस परिचिताने विचारले की एका contracting कंपनीत अकाऊंटंटची पोस्ट रिकामी आहे, तर नोकरी करणार का? इलेक्ट्रो मेकॅनिकल कंपनी होती व मालक भारतीय होते किणी. कामाला सुरुवात केली. कंपनी म्हणजे एक मोठा गोंधळ होता. कसलाच ताळमेळ नव्हता. त्यांनी पुण्याला नोकरी केली होती. अनुभव होता. कंपनीचे चेअरमन उपेंद्र माधव किणी. त्यांना त्या काळी ओमानमध्ये 'मिनी सुलतान' म्हणत असत. त्यांच्या १६ कंपन्या होत्या. २५००/३००० कामगार काम करत होते. वयाच्या ४०व्या वर्षीच त्यांनी एक यशस्वी उदयोजक म्हणून नाव मिळवले होते.

एक दिवस ते ऑफिसमध्ये आले आणि त्यांनी श्रुती यांना बोलावले आणि विचारले तुम्ही मिसेस गोखले का ? तुम्ही चीफ अकाऊंटंट व्हाल का? त्या म्हणाल्या, "माझी तयारी आहे. आत्ता पण मीच सर्व काम करते, मी करत असलेल्या कामाचा पूर्ण मोबदला मात्र मला मिळत नाही. मला माझ्या कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. तरच मी कामाला तयार आहे." त्यांना स्टाफकडून अशा प्रकारच्या उत्तराची सवय नसावी. त्यांनी मला विचारले. आत्ता किती मिळतात १०० रियाल. आता २५० रियाल मिळायला हवेत. त्यांनी मान्य केले आणि चीफ अकाऊंटंट म्हणून त्यांनी कंपनीचे काम बघण्यास सुरुवात केली.

त्यांनी बारीक सारीक सुधारणा कंपनीत केल्या. ऑफिसला एक शिस्त लागली. कंपनीत आमूलाग्र बदल झाले आणि १९८५ मध्ये ही कंपनी ओमानमधील नंबर एक electrical contracting कंपनी ठरली. ओमानमध्ये, किणींनी ८२मध्ये फेन्सिंग बनवायची फॅक्टरी सुरू केली होती; परंतु हवे तसे यश आले नव्हते. मिस्टर किणींनी त्यांना त्यात लक्ष घालायला सांगितले, १९८५ मध्ये त्यातलं श्रुती यांना काही माहीत नव्हतं त्यावेळी त्यांनी सर्व स्टाफला गुरू बनवल, त्यांच्याकडून शिकून घेतलं आणि ती कंपनी भरभराटीला नेली. त्याच सुमारास प्रथमच ओमानमध्ये GCC मीटिंग होती. त्यासाठी तेथील सरकारने ६० मिलियन डॉलर खर्च केले. डबल रोड्स बनवले होते. अल बुस्तान हॉटेल बनवले. तो काळ असा होता की सर्वच कंपन्यांनी खूप प्रॉफिट केला. त्यांच्या कंपनीलासुद्धा चांगला प्रॉफिट झाला; परंतु १९८५ व ८६मध्ये ओमनी नोटांचं डीव्हॅल्युएशन झालं आणि सर्व कंपन्यांची अवस्था बिकट झाली. कधी काळी १६ कंपन्यांचा मालक असलेल्या किणींचे सेव्हिंग झिरोवर पोहोचले. म्हणून त्यानी दुबईला शिफ्ट व्हायचं ठरवलं. थोडे पैसे कीणी यांच्याकडचे, श्रुतीकडचे थोडे पैसे यातून जिद्दीने कंपनी सुरू केली. त्यांच्या पतीनेही त्यांना साथ दिली. ओमान सोडून १९८७ मध्ये ते सर्व नवी स्वप्ने घेऊन स्वप्ननगरी दुबईत आले. बऱ्याच प्रयत्नांनी त्यांची 'लिंक मिडल ईस्ट' ही कंपनी सुरू झाली. त्यांचे मिस्टर जयंत कंपनीचे कमर्शिअल डायरेक्टर झाले. ते shop floor आणि फॅक्टरीचे काम बघायचे, त्या फायनान्स आणि मार्केटिंग साईड बघत असत. किणी मदत करायचे, शिकवायचे. CA घेतले आणि १० कामगार घेतले आणि अक्षरशः door to door जात काम आहे का विचारत त्या फिरल्या. हळूहळू नवीन कंपनी आकार घेऊ लागली, fencing आणि गेबीअन दोन उद्योग सुरू झाले. हळूहळू गेबीअनला इंटरनॅशनल मार्केट मिळायला लागले.

**Gabion म्हणजे** - हे एक इटालियन तंत्रज्ञान. एका इटालियन कंपनीने १८७४ मध्ये शोधून काढले होते. मिस्टर किणींना १९७७ मध्ये या टेक्नॉलॉजी बद्दल समजले आणि ते त्या कंपनीचे एजंट झाले होते. १९८५मध्ये त्यांनी इटालियन कंपनीला सांगितले की आता आमची कंपनी ही काम सुरू करत आहे. तुम्ही जॉईन व्हा, तर त्यांनी अशा तुच्छतेने पाहिले की तुम्ही इंडियन काय करणार? तुम्हाला ते जमणारच नाही. मग हे जिद्दीला पेटले. त्या जपानला जाऊन त्यांनी रिसर्च केला आणि मशिन तयार झाले आणि नंतर ते संपूर्ण जगात त्या इटालियन कंपनीचे एकमेव स्पर्धक ठरले. जवळ जवळ सर्व जग आत्तापर्यंत इटालियन कंपनीकडून माल घेत होते, पण श्रुती यांची कंपनी first fighter होते. त्यांना प्रथम वाटले, ही एकटी बाई. त्यातून इंडियन ही काय करणार, तिला जमणार नाही. पण त्यांना खात्री होती, प्रथम दुबई नंतर ओमान, सौदी, जॉर्डन, इराक, इकडे सिंगापूर, मलेशिया, इंडोनेशिया, थाय, तैवान, कोरिया अशा प्रकारे ९५ पर्यंत देश south east asia कॅप्चर केले. नंतर ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, फिजी सर्वकडे उद्योग सुरू केले. ज्यावेळी युरोपमध्ये पंख पसरायला सुरुवात केली. तेव्हा हे इटालियन खूप चिडले. अक्षरशः वाईल्ड झाले. मिस्टर किणींना धमक्या येऊ लागल्या की आम्ही सर्व माफिया गँगचे आहोत. तुम्ही जर हे थांबवले नाहीत तर आम्ही तुम्हाला मारून टाकू. शेवटी श्रुती यांची कंपनी खुद्द सुलतान सुलेम यांच्याकडे गेले. सुलतान म्हणाले की तुम्ही निर्धास्तपणे तुमचे काम करा, इथे दुबईमध्ये तुमच्या केसाला ही कोणी धक्का लावणार नाही. एक भारतीय स्त्री काय करू शकते हे श्रुती यांनी त्यांना दाखवून दिले! आज Centor Electric tracting co ही दुबईतील नंबर एकची कंपनी झाली आहे. दरम्यान श्रुती यांच्यावर आभाळ कोसळलं. किणी यांचं दुर्दैवी निधन झालं; परंतु सर्व जबाबदारी अंगावर घेत त्यानी काम पुढे नेलं. Electrical Contracting co ही दुबईतील नंबर १ कंपनी आहे. व ८०० कामगार तिथे काम करतात आणि Link Middle East जगामध्ये ७०हून अधिक देशांमध्ये काम करत आहे. गेली ३० वर्षे ४०० मिलियन देरहमची कामे दरवर्षी ही कंपनी करते. कंपनीतील शेअर्स इ. सर्व कायदेशीरबाबी पूर्ण केल्या. इतकच नाही तर कंपनी हे आपलं कुटुंब आहे आणि कुटुंबाच्या प्रत्येक सदस्याची काळजी घेणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. म्हणून कोणाची आजारपणं, कोणाला भारतात काही अडचण असेल तर सर्वतोपरी सहाय्य केले जाते. जर खरोखर कॅपेबल असतील तर त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी मी घेते, असं त्यांनी सांगितलं. या कामगारांच्या जोरावर खूप पैसा कमावला त्यामुळे त्यांच्यासाठी आणि गरिबांसाठी त्या मोठ्या प्रमाणावर काम करतात. केरळ मध्ये ८० निराधार बायकांना त्यांनी दत्तक घेतले आहे आणि त्यांची संपूर्ण जबाबदारी घेतली आहे. तसेच पुण्यामध्ये वृद्धाश्रमासाठी जागा घेतली आहे. आजच्या तरुणांना तुम्ही काय सल्ला द्याल? असं विचारलं असता त्या म्हणाल्या की त्यांच स्वतःच शिक्षण मराठी माध्यमातून झाले, यशामध्ये भाषा, जात, धर्म किंवा आर्थिक परिस्थिती कोणतीही गोष्ट माझ्या प्रगतीच्या आड आली नाही. आज जगामध्ये ७० देशांमध्ये आमची कंपनी काम करते, मी सर्व ठिकाणी साडी हा मराठी पेहेराव घालून power point presentation करायला उभी राहते, माझे इंग्रजी हे हायफाय इंग्रजी नाही, तर ते मराठी इंग्रजी आहे. पण हे काहीच आड येत नाही. कारण एकतर विषयाचे सखोल ज्ञान आणि जबरदस्त आत्मविश्वास. मी कॉम्प्युटर आणि त्या संबंधित सर्व गोष्टी शिकले ! बदलत्या काळानुसार आवश्यक ते शिक्षण घ्यायचे आणि काळाबरोबर राहायचे हे सूत्र लक्षात ठेवले आहे आणि म्हणूनच आजच्या विद्यार्थ्यांना त्याचबरोबर विशेषतः पालकांना मला सांगावेसे वाटते की, शिक्षणाच्या माध्यमाने काहीही फरक पडत नाही. आवश्यक आहे भविष्याचा वेध घेण्याची विचारशक्ती, जिद्द, मेहनत, आत्मविश्वास. हे असेल तर माणूस भारतात काय जगाच्या पाठीवर कुठेही यशस्वी उद्योजक होऊ शकतो हे श्रुती गोखले यांनी दाखवून दिलं आहे.



सेवाव्रती
**शिबानी जोशी**
joshishibani@yahoo. com

## जनसंवाद

### राज यांची दिलजमाई होईल का?

आगामी काळातील महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी उबाठा गटाचे बडे नेते आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी एकत्रित येणे काळाची गरज बनली आहे. काही वर्षांपूर्वी अंतर्गत कलहावरुन या दोन बड्या नेत्यांमध्ये उभी फूट पडली. ती अजुनपर्यंत सांधली गेली नाही. शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे होते तोपर्यंत परप्रांतीयांची मराठी लोकांना बोलण्याची आणि हात लावण्याची हिम्मत होत नव्हती, मात्र शिवसेना पक्ष फोडल्यापासून अशी लोकं शिरजोर झाली आहेत. ही बाब नजरेआड करता येत नाही. मराठी माणसांच्या हक्कासाठी लढणारा पक्ष म्हणून शिवसेनेची ख्याती होती. सध्या याची दयनीय अवस्था झाल्याने मराठी माणसांचा अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यासाठी वेळीच अशा लोकांना रोखण्यासाठी आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या मनातील शिवसेना उभी करण्यासाठी पुन्हा एकदा या दोन बंधूनी शिवसेनेची नव्या दमाने पुनर्बांधणी करणे अपेक्षित आहे. आजच्या राजकिय क्षेत्रात सर्वच पक्षांना उपऱ्या लोकांची लागण झाली आहे. त्यामुळे रोज एक नेता राजकीय फायद्यासाठी कोलांट्या उड्या मारत आहेत. येणाऱ्या काळात महानगर पालिका, नगर पालिका, जिल्हा आणि तालुका पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका येत आहेत. या निवडणुकांमध्ये ठाकरे भावांना आपल्या पक्षाचा परफॉर्म दाखवणे आणि विश्वास संपादन करणे जरुरीचे आहे. एकेकाळी शिवसेनेचे नांव जरी एकले तरी गुंड - पुंड लोक पळायचे एवढे शिवसेनेचे वादळं होते. सद्या दोघेही बंधू परदेश दौऱ्यावर असून २९ एप्रिल नंतरच खरे समोर येणार असले तरी सध्याच्या घडीला ठाकरे बंधूनी आपले मतभेद बाजूला सारून पुन्हा एकदा शिवसेनेचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी दोघांनी एकत्र येणे काळाची गरज बनली आहे.

**- राजू जाधव,** मांगूर जि. बेळगाव

### 'तटस्थ चौकशी' नको

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यासाठी भारताने पाकिस्तानला जबाबदार धरले आहे. त्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध कठोर राजनैतिक पावले उचलली आहेत. तसेच हल्लेखोरांशी पाकिस्तानचा थेट संबंध असल्याचे पुरावे सापडल्याचे भारताने आंतरराष्ट्रीय समुदायाला कळवल्याने पाकिस्तान या हल्ल्याप्रकरणी 'तटस्थ चौकशी'ला तयार असल्याचे पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी सांगितले आहे. भारताच्या कोणत्याही कृतीला पूर्ण ताकदीने प्रत्युत्तर दिले जाईल असे म्हणणाऱ्या पाकिस्तान बरोबर 'तटस्थ चौकशी' नको. या तटस्थ चौकशीच्या मागणी आडून पाकिस्तानची भीती उघड झाली आहे. उरी व पुलवामा हल्ल्याच्या वेळी भारताने राजनैतिक पावले उचलली नव्हती. पण आता भारताने युद्धसराव सुरू केला असून पाकिस्तानमध्ये प्रचंड तणावाची परिस्थिती आहे.दहशतवाद्यांना आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांना त्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त मोठी शिक्षा देणार आहोत. तेव्हा 'तटस्थ चौकशी' न करता दहशतवाद्यांना व पाकिस्तानला नेस्तनाबूत केल्याशिवाय भारत सरकार स्वस्थ बसू नये.

**- विवेक तवटे,** कळवा, ठाणे

### ईडी कार्यालयातील आगीमागे संशयाचा धूर ?

फोर्टमधील ईडीच्या कार्यालयाला लागलेल्या आगीत अनेक महत्त्वाची कागदपत्रे व पुरावे जळून खाक झाल्याची बातमी वाचनात आली. यामुळे काही प्रकरणाच्या तपासावर परिणाम होणार असल्याचे कळते. अशाच प्रकारची आग काही वर्षांपूर्वी मंत्रालयातही लागली होती आणि तेव्हाही महत्त्वाचे कागदपत्र जळाले होते, तर प्रादेशिक परिवहन विभागाच्या पुणे, नाशिक, ठाणे, मुंबई (ताडदेव) येथील कार्यालयांनी सात-आठ वर्षांपूर्वी ठराविक अंतराने लागलेल्या आगीत वित्तहानी व महत्त्वाची कागदपत्रे जळणे हे सामायिक घटक होते आणि त्यामुळे त्या आगींमागे संशयाचा धूर जाणवला होता. तसंच काहीसं संशयाचं वातावरण ईडी कार्यालयाला लागलेल्या आगीमुळे तयार झाले आहे. किंबहुना ज्या ज्या आगीत महत्त्वाची कागदपत्रे जळून नष्ट होतात त्या त्या आगींच्या घटनांकडे अशीच संशयाची बोटे उभारली जातात. त्यामुळे अशा प्रकरणांची सखोल चौकशी होणे आवश्यक ठरते.

**- दीपक काशिराम गुंडये,** वरळी.

### विरोधी पक्षाचा नेरेटिव्ह...

आपल्या देशात प्रत्येक गोष्टी, घटनेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करणे हे विरोधी पक्षाचे नेहमीचे काम झाले आहे. ही मंडळी कधीच समाधानी नसतात. नुकताच काश्मीर मधील पहलगाम येथे निरपराध हिंदू धर्मीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात एक नाही सत्तावीस लोकांना गोळी मारून ठार करण्यात आले. विशेष म्हणजे धर्म विचारून हे घृणात्मक कृत्य या मुस्लिम दहशतवाद्यांनी केले आहे. आता सरकारच्या गुप्त यंत्रणेवर तसेच अपयशाबद्दल विरोधीपक्षा द्वारा प्रश्न उपस्थित केल्या जात आहे. तसेच हल्लात धर्म विचारला गेला हे स्पष्ट दिसत असताना तसेच मृतांचे नातेवाईक सांगत असताना शरद पवार सारख्यांनी असे काही बोलल्याचे मी ऐकले नाही असे त्यांच्या द्वारा सांगितले जात आहे.
दुसरे असे की, आतंकवादी हे मुस्लिम धर्मीय असताना त्यांना मुस्लिम म्हणू नका ते फक्त आतंकवादी आहेत. अशा कथा सांगितल्या जात आहेत. या सोबतच आतंकवादीना कोणताच धर्म नसतो असे त्यांच्या समर्थनार्थ ही मंडळी सातत्याने सांगत आहेत. या हल्ल्यात काही पर्यटकांना तेथील काही मदतसिनांनी मदत केली तर मग या मंडळींचा धर्म मुस्लिम सांगितला जातो. निष्पाप हिंदूंवर हल्ला केला जातो तेंव्हा तो आतंकवादी आणि मदत केली तो मुसलमान वारे वा... असल्या दुटप्पी भूमिकेमुळे आज देशाला दहशतवादी समस्यांना सामोरे जावे लागते.

**- अविनाश देशपांडे,** पुणे

## राशिभविष्य

मंगळवार, २९ एप्रिल २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती वैशाख शुद्ध द्वितीया शके १९४७. चंद्र नक्षत्र कृतिका. योग सौभाग्य. चंद्र राशी वृषभ. भारतीय सौर ९ वैशाख शके १९४७. मंगळवार दिनांक २९ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.१२ मुंबईचा चंद्रोदय ७.०९, मुंबईचा सूर्यास्त ७.०० मुंबईचा चंद्रास्त ८.५६ राहू काळ ३.४८ते ५.२४ चंद्रदर्शन, श्री परशुराम जयंती, शुभ दिवस.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : समाजात काही भरीव कामगिरी कराल.

**वृषभ** : कुटुंबातील वातावरण चांगले राहील.

**मिथुन** : भावनाविवश होऊन कोणताही निर्णय घेऊ नका.

**कर्क** : प्रगतीचे नवीन मार्ग दिसू लागतील.

**सिंह** : कुटुंबात आनंदी वातावरण राहील

**कन्या** : आर्थिक उलाढालीला गती मिळेल.

**तूळ** : सकारात्मकतेने कामात लक्ष केंद्रित करा.

**वृश्चिक** : कार्यक्षेत्रात नवीन संधी मिळतील.

**धनू** : आज प्रगतीचा आलेख चढता.

**मकर** : कोणावरही अति विसंबून राहू नका.

**कुंभ** : अपेक्षा न करता कार्य करत राहावे.

**मीन** : एकाग्रता ढळू देऊ नका.



## काव्यकोडी

**एकनाथ आव्हाड**

### वासुदेव आला

हातात चिपळ्या
गळ्यात माळा
मोरपिसांची टोपी
गाता गळा

घोळदार झगा
काखेत झोळी
खांद्यावर शेला
टिळा कपाळी

पावा वाजवीत
अंगणात येई
देवाची गाणी
सुरात गाई

सुपातील धान्य
झोळीत घेई
'दान पावलं...'
आरोळी देई

मुलांचा घोळका
जमतो भोवती
आनंदाला मग
येतेच भरती

सकाळच्या पारी
हरीनाम बोला
गाव जागं करायला
वासुदेव आला
हो वासुदेव आला...

१) किलबिल याच्या
पडती कानी
यालाच सुचतात
फुलांची गाणी

फांद्या याच्या
हलती छान
हसते कोणाचे
पान न् पान ?

२) येथे भेटते
मित्रमंडळ
गुरुजी, बाई
खूप प्रेमळ

वह्या, पुस्तके
आणखी अभ्यास
कोठे होतो
आपण पास?

३) गाय, वासरू
मांजर, मोती
मला पाहताच
हरखून जाती

त्यांच्याशी आहे
माझी दोस्ती
कोण बरं हे
माझे सोबती?

उत्तर -
१)
२)
३)

eknathavhad23 @gmail.com

## बक्षीस जिंका

चित्र रंगवून ई-मेल करा आणि बक्षिसे जिंका चित्रासोबत नाव व पत्ता लिहून पाठवणे.

kilbil@prahaar.co.in


**चित्र रंगवा आणि बक्षीस मिळवा...**

चित्र रंगवून कात्रण ई-मेल करा अथवा टपालाद्वारे गुरुवारपर्यंत पाठवणे.

स्पर्धकाचे नाव, फोटो शाळेचे नाव व ठिकाण, इयत्ता, घरचा पत्ता आणि संपर्क क्रमांक.

सर्वोकृष्ट चित्र रंगवणाऱ्या विजेत्याला बक्षीस आणि प्रसिद्धी दिली जाईल.

प्रहारचे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारास स्पर्धेत भाग घेता येणार नाही.





**चित्र रंगवा विजेता :**
**आयुष रुपेश पाटील**
शाळा : आरएमव्ही सेक्टर-१६, ऐरोली, नवी मुंबई ४०० ७०९

परीक्षक : मनिषा दिवाकर जाधव
मुख्याध्यापिका
सुषमा पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज, कामोठे. नवी मुंबई.





# दवबिंदू कसे पडतात?

**कथा**
**प्रा. देवबा पाटील**



दररोज सकाळी नेहमी उशिरा उठणारा स्वरूप आता रोज सकाळी लवकर उठू लागला व आपल्या आजोबांसोबत बाहेर मोकळ्या हवेत मस्त फिरायला जाऊ लागला. असेच त्या दिवशीही ते दोघे फिरायला निघाले.

चालता चालता स्वरूपचे लक्ष गवताच्या झाडाच्या पानांवरील थेंबांकडे गेले. "आज सकाळी पाऊस नसूनही झाडांच्या पानांवर, हिरवळीवर ते पाण्याचे चमकदार थेंब कसे काय पडलेले दिसतात हो आजोबा?" स्वरूपने विचारले.

"वातावरणातील पाण्याच्या वाफेचे थंडीने गोठून जेव्हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील वस्तूंवर हिमस्फटिक बनतात तेव्हा त्याला दहिवर किंवा दव म्हणतात. बऱ्याच वेळा रात्री हवेपेक्षा झाडाझुडपांची, वनस्पतींची पाने, गवत अधिकाधिक थंडगार होतात. हवेतील बाष्पकण जेव्हा या थंडगार पानांवर पडतात तेव्हा त्यांचे पाण्याच्या थेंबात रुपांतर होते. पाण्याच्या या गोलाकार थेंबांना "दवबिंदू" म्हणतात. सूर्योदयाबरोबर त्यांवर पडलेल्या प्रकाशामुळे हे दवबिंदू छानपैकी चमकतात. असे अनंत दवबिंदू एकत्र आल्याने "दव" बनते." आजोबांनी सांगितले.

"आजोबा दवबिंदू गोलाकारच का दिसतात?" स्वरूप म्हणाला.

"दवबिंदू म्हणजे पाण्याचा थेंबच असतो. निसर्गाचा असा नियम आहे की, कोणतीही वस्तू शक्य तितका आपला पृष्ठभाग कमी होईल असा आकार धारण करते. गोलाकार हाच कमीतकमी पृष्ठभाग असलेला आकार असतो. कोणत्याही द्रवाच्या एका थेंबामध्ये लाखो रेणू असतात. त्यांच्यामध्ये खूप आकर्षण असते. त्यामुळे हे सारे रेणू परस्परांना स्वतःकडे ओढून धरण्याचा सतत प्रयत्न करत असतात. थेंबाच्या आतील भागातील रेणू हे थेंबाच्या पृष्ठभागावरील रेणूंना आपल्याकडे खेचून घेत असतात. तसेच पृष्ठावरील रेणूसुद्धा एकमेकांना आपल्याकडे ओढत असतात. म्हणजेच दवबिंदूच्या पृष्ठभागावर चोहीकडून पृष्ठीय ताण असतो. रेणूंच्या या आपसातील ओढाताणीमुळे म्हणजेच त्या ताणाने द्रवाच्या दवबिंदूचा आकार लहानात लहान असा तयार होतो. कोणत्याही इतर आकारांपेक्षा गोल आकाराचा पृष्ठभाग हा सर्वात लहान असतो म्हणून दवबिंदू हा गोलाकार बनतो." आजोबांनी स्पष्टीकरण दिले.

"हे दवबिंदू चमकदार का दिसतात हो आजोबा?" स्वरूपने प्रश्न केला.

आजोबा म्हणाले, "दवबिंदूच्या थेंबावर पडलेल्या प्रकाशाचा काही भाग हा त्यातून पलीकडे आरपार जातो. त्यामुळे तो पारदर्शक दिसतो. तसचे काही प्रकाश त्यावरून परावर्तितही होतो. त्यामुळे तो चमकदारही दिसतो. अत्यल्प प्रमाणात प्रकाश दवबिंदूत शोषलाही जातो. हे गोलाकार दवबिंदू भरीव असल्याने बहिर्वक्र भिंगासारखे कार्य करतात म्हणून त्यातून गवताचे पान आपणांस थोडेसे मोठेही दिसते."

"मग ते दिवसा का नाही दिसत आजोबा?" स्वरूपने विचारले.

"सूर्य जसजसा वर वर येतो तसतशी जमीन तापू लागते, वातावरणात थोडी थोडी उष्णता वाढू लागते व जमिनीवरील वस्तू, झाडेझुडपेही तापू लागतात. त्यामुळे त्यांवर असणाऱ्या दवाची वाफ होऊन ते दवबिंदू नाहीसे होतात." आजोबा म्हणाले.

"दव कमी-जास्त कोणत्या काळात पडतो?" स्वरूपने प्रश्न केला.

"आकाश जेव्हा निरभ्र असते तेव्हा हवेत पाण्याची वाफ जास्त असते. झाडेझुडपे, गवत, रोपटे ही रात्री थंड असतात म्हणून या वेळी दव जास्त पडतो. थंडीच्या दिवसांत दव जास्त पडतो. जेव्हा वातावरण ढगाळलेले असते तेव्हा झाडेझुडपे रात्री जास्त थंड नसतात. त्यावेळी दव कमी पडते." आनंदरावांनी सांगितले व बोलता बोलता मागे फिरले. स्वरूप समजून गेला की आता आपणास घराकडे जायचे आहे. तोही आजोबांप्रमाणे मागे फिरला.



# झुळूक



**कथा**
**रमेश तांबे**



सकाळचे दहा-साडेदहा झाले असावेत. सूर्याचं तळपणं सुरू झालं होतं. हवेतली उष्णता वेगाने वाढत होती. खरे तर एप्रिल महिन्याचे दिवस सुरू होते. हवेत असहाय असा उकाडा होता. घराच्या बाहेर पडूच नये असं वाटत होतं. तरी महत्त्वाचे काम असल्याने मी पश्चिम रेल्वेने दादरहून विरारच्या दिशेने निघालो. रविवारचा दिवस असल्याने गाडीत तुलनेने गर्दी कमी होती. खिडकी जवळची जागा पटकावून मी निवांत बसलो. गाडीने वेग पकडला तसा गरम हवेचा झोत अंगावर आदळू लागला. तो टाळण्यासाठी मी उलट्या बाजूला बसलो. जेणेकरून गरम हवा अंगावर येणार नाही. मग निवांत झालो आणि हातातलं वृत्तपत्र उघडून बातम्यांमध्ये डोकं खूपसलं.

हिंदू-मुस्लीम समाजात वाढत चाललेली तेढ! दंगली, जाळपोळ, मारामाऱ्या, घटस्फोट, आर्थिक गुन्ह्यांची प्रकरणं, नेतेमंडळी, शासकीय अधिकारी वर्गाच्या भ्रष्टाचाराच्या बातम्या. या साऱ्या बातम्यांनी मनात निराशेचे ढग दाटून आले. मन सुन्न झाले. मग मी पेपर मिटून घेतला अन् विचारांच्या अधीन झालो. गाडीने वांद्रे स्थानक सोडले अन् दोन व्यक्तींनी आमच्या डब्यात प्रवेश केला. भडक रंगाचे मळके कपडे त्यांनी घातले होते. विस्कटलेले केस, दाढीचे वाढलेले पांढरे खुंट, एकाने डोक्याभोवती गुंडाळलेले फडके अन् दारिद्र्याने गांजलेले निराश चेहरे! अगदी कुणालाही कीव वाटावी अशीच त्यांची नजर!

माझं मन एकविसाव्या शतकातील भारत आणि वस्तुस्थिती अशी तुलना उगाचच करू लागलं! एकाच्या गळ्यात हार्मोनियम म्हणजेच पेटी आणि दुसऱ्याच्या हातात काठी होती. आता त्यातला एक जण खड्या आवाजात विठ्ठलाची गाणी म्हणू लागला. तोच गाडीतल्या सहप्रवाशांनी आपापल्या माना त्यांच्याकडे वळवल्या.

"माझे माहेर पंढरी" हा अभंग त्याने इतका छान म्हटला की बस्स! काही प्रवाशांनी, तर टाळ्याच वाजवल्या. मीही त्यांच्या गायकीवर आणि पेटी वाजवण्याच्या कलेवर बेहद्द खूश झालो. आता जाता जाता त्यांना काही पैसे रुपी मदत केली पाहिजे हा विचार मनात चमकून गेला. त्यातला जो पेटी वादक होता त्याला थोडेसे दिसत असावे. कारण तो दुसऱ्याचा हात धरून त्याला लोकांपुढे उभा करत होता.

त्यानंतर त्याने चक्क माझा आवडता अभंग गाण्यासाठी निवडला आणि तो म्हणजे "कानडा राजा पंढरीचा!" मग काय पुढची आठ-नऊ मिनिटे आम्ही सारेच विठ्ठल नामात तल्लीन झालो. पेटीवाला वादक त्याला तेवढीच तोलाची साथ देत होता. गाडीतली सारी माणसे त्यांच्या गायकीवर खूश झाली. पेटीवाल्याने पेटीवरच मदतीसाठी थाळी ठेवली होती. त्यात पटापटा पैसे पडू लागले. आता ते भिकारी नसून गायक आहेत, वादक आहेत आणि आम्ही सगळे प्रवासी नसून रसिकश्रोते आहोत असा माहोल डब्यात तयार झाला. बोरीवली स्टेशन येईपर्यंत त्यांनी जवळपास सहा-सात अभंग गायले. मघाशी वृत्तपत्रातल्या बातम्या वाचून निराश झालेले मन अभंग श्रवणाने आनंदित झाले. मी तर त्यांच्या गायकीवर खूप खूश झालो. त्यांच्या थाळीत पन्नास रुपयाची नोट टाकावी असा विचार मनात येताच पेटी वाजवणाऱ्या माणसाने आपल्या गायक मित्राला हाक मारली "अरे अब्दुल चल, अभी अपना बोरीवली स्टेशन आनेवाला है!" "हा चंदू चल जाऊया!" गायक अब्दुल म्हणाला.

त्यांच्या या वाक्यांनी माझ्यावर अक्षरशः कोणीतरी गार गार पाण्याचा हंडा रिकामा केला आहे असेच वाटले. खरंच मी तर अगदी अंतर्बाह्य थिजूनच गेलो. काय! नाव अब्दुल! आणि विठ्ठलाचे अभंग गातोय...? अगदी अस्खलित मराठीत अन् तेही इतक्या तल्लीन होऊन! माझ्या अंगावर सर्रकन काटा आला.

एका बाजूला धर्माच्या, भाषेच्या नावाखाली चाललेल्या दंगली, जाळपोळ आणि लुटालूट. त्यात होणारी सामान्यांची होरपळ अन् दुसऱ्या बाजूला माणूसकी हाच धर्म समजून पोटासाठी एकत्र आलेले हिंदू-मुस्लीम मित्र! त्यांचं एकमेकांवर असलेलं प्रेम, जिव्हाळा मनाला अगदीच स्पर्शून गेलं आणि अनेकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजनदेखील घातलं गेलं. कारण उठसूट धर्म, भाषा बुडाल्याच्या गोष्टी करत समाजमन गढूळ करण्याचं काम अनेकांकडून चालू असतं. पण ही अब्दुल-चंदूची जोडी "खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे" हा माणुसकी धर्माचा मंत्र आळवत आमच्या पुढे आदर्श निर्माण करू पहात होते.

त्यांच्या थाळीत शंभर रुपयांची नोट मोठ्या नम्रपणे ठेवत मी त्यांच्या माणुसकी धर्माला आणि गायकीला सलाम केला!

# स्वभाव



**प्रतिभारंग**
**प्रा. प्रतिभा सराफ**



जपानमधल्या पहिल्याच दिवशी एक वेगळा अनुभव मिळाला. तिकडच्या हॉटेलमध्ये आम्ही नाष्ट्यासाठी गेलो होतो. प्रत्येकाच्या हातातील कुपन बघून ते विचारत होते की, तुम्ही किती जण एकत्र आहात? मी आणि माझ्या मैत्रिणीने सोबत असल्याचे सांगितले. तेव्हा एक माणूस आम्हाला सोबत घेऊन गेला आणि त्याने आम्हाला एका टेबलावर बसवले. टेबल सहा माणसांचे होते. त्या टेबलाच्या मध्यावर एक काचेची स्क्रीन होती जी हिरवा रंग दाखवत होती. तो माणूस म्हणाला की, तुमचा नाश्ता झाला की, खालचे बटन दाबा म्हणजे ही स्क्रीन लाल रंगाची होईल तोपर्यंत हा टेबल कोणालाही दिला जाणार नाही. ही त्यांची पद्धत आम्हाला खूप आवडली. कारण खांद्यावरच्या पर्समध्ये पासपोर्ट असल्यामुळे पर्स एक मिनिटसुद्धा खाली ठेवणे शक्य नसायचे; परंतु टेबल नंबर लक्षात ठेवून आम्ही वाढून घ्यायला गेलो. शंभरच्या वर असलेल्या पदार्थांमधून आपण काय खाऊ शकू, याचा विचार करण्यात खूप वेळ गेला आणि मग आपण वाढून घेऊन आपल्या टेबलापर्यंत आलो तेव्हा तो टेबल जणू आपलीच वाट पाहत बसलेला दिसला, याचे बरे वाटले. म्हणजे त्याचा कोणीही ताबा घेतलेला नव्हता. एखादी गोष्ट आवडली म्हणून किंवा चहा-कॉफी, ज्यूससाठी आपण उठलो तरी आपल्या टेबलावर कोणीही येऊन बसणार नाही याची खात्री होती. त्यामुळे एका वेळेस दोघीजणी सोबतही उठू शकलो! हे सगळे सांगण्याचे कारण म्हणजे आमच्या बाजूला सहा माणसांचा टेबल होता. ज्यावर केवळ एक जपानी माणूस बसलेला होता. तो काहीतरी वाढून घेण्यासाठी उठला तितक्यात आमच्याच ग्रुपमधल्या एक बाईने आपली पर्स त्या टेबलाच्या कोपऱ्यावर ठेवली आणि तिने आपल्या नवऱ्याला फोटो काढायला सांगितले जेणेकरून त्या हॉटेलमध्ये उत्कृष्टपणे मांडलेले पदार्थ तिच्या फोटोत मागच्या बाजूला व्यवस्थित दिसावेत असे. इतक्यात हा जपानी माणूस काहीतरी वाढून घेऊन आला आणि त्याच्या खुर्चीवर बसला. तो बसला होता त्याच्या विरुद्ध कोपऱ्यावर या बाईने ठेवलेली पर्स पाहून तो चिडला. त्याने त्या बाईला आवाज दिला म्हणजे 'बाई', 'मॅडम' असा काही तो शब्द नव्हता बहुतेक जापनीज शब्द होता. मला समोर हे दृश्य दिसत होते. त्यामुळे मी त्या बाईला म्हटले की, अहो तो तुम्हाला बोलवत आहे. त्या बाईने त्यांच्याकडे वळून पाहिले, तर त्यांनी सांगितले की आधी ही पर्स उचला. तो हे जापनीजमध्ये बोलला; परंतु त्याच्या ॲक्शनवरून बाईला काय ते उमगले आणि तिने पर्स उचलली. आता एखाद्या माणसाला एक फोटो काढायला कितीसा वेळ लागणार? पण तितकाही मिनटा-दोन मिनिटांचा संयम या माणसाकडे नव्हता किंवा त्याच्या टेबलावर ठेवलेली वस्तू त्याला आवडली नाही. इथे कदाचित हायजिनचा (स्वच्छता) प्रश्न असेल किंवा त्याच्या रिझर्व्ह नेचरचा. (राखीव स्वभावाचा) याच गोष्टीमुळे जितके लोक सोबत एकत्र आहेत त्यांना एकत्रितपणे टेबल दिला जातो मग भले एक माणूस का सहा माणसांच्या टेबलावर असेना!

पहिल्याच दिवशी असा अनुभव आल्यामुळे आम्ही सहसा रस्त्यात भेटलेल्या जापनीज माणसांची बोलायला धजावलो नाही. तसेही त्यांना तरी कुठे आमच्याशी बोलायचे होते म्हणा? ते त्यांच्या कामात. दोन दिवसांनंतर आम्ही ज्या हॉटेलमध्ये उतरलो होतो तिकडची वाय-फाय सर्विस (इंटरनेट आणि इतर नेटवर्कशी जोडणी) चालू नव्हती. मी रिसेप्शनमध्ये फोन करून याविषयी सांगितले. तीन मिनिटांत एक मुलगी आमच्या दाराशी आली. तिने बेल वाजवली. मी दार उघडल्यावर तिने तिची बूटं दाराशी काढून ठेवले आणि ती सॉक्स घालून आतमध्ये आली. तिच्या हातामध्ये कोणतेतरी यंत्र होते. त्याची जोडणी करून तिने आमची वाय-फाय सर्विस सुरू करून दिली. त्यानंतर ती मोबाईलमध्ये काहीतरी बराच वेळ टाईप करत होती. त्यानंतर तिने तो मोबाईल माझ्यासमोर धरला. मी त्यावर वाचत गेले. त्यात इंग्रजीमध्ये असे लिहिले होते की वाय-फाय सर्विस चालू नसल्यामुळे आपल्याला जो त्रास झाला त्यासाठी हे हॉटेल आणि मी आपली क्षमा मागते. गुगल ट्रान्सलेटर वापरून तिने जापनीजमध्ये जे काही टाईप केले होते ते मला इंग्रजीमध्ये वाचता आले.

जपानमध्ये ९० टक्के लोकांना अजिबातच इंग्रजीचे ज्ञान नाही; परंतु या नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून ते कमीत कमी अशा तऱ्हेने आमच्याशी संवाद साधू शकले. मी तिच्या मोबाईलवर वाचताना सुद्धा तिच्या डोळ्यांतले आणि चेहऱ्यावरचे भाव वाचत होती तिला खरंच वाईट वाटल्याचं त्यातून प्रतीत होत होते. माझे वाचून झाल्यावर मी फोन तिच्या हातात दिला ती कमरेतून वाकली आणि तिने हात जोडून क्षमा मागितली.

अशी जपानमध्ये वावरत असताना अनेक माणसांची अनेक उदाहरणे आहेत. शेवटी माणूस सारखाच. एका हॉटेलमधील एक जपानी पाहुणा आणि त्याची एका भारतीय बाईशी वर्तणूक आणि दुसऱ्या हॉटेलमधील भारतातील आपण पाहुणे असताना तेथील हॉटेलच्या जपानी कर्मचाऱ्यांची आपल्याशी वर्तणूक पाहता जपानी माणूस म्हणजे असा... असे कोणतेही विधान आपण करू शकत नाही. ते दोघेही आपापल्या पद्धतीने बरोबरच होते. आपल्याला याविषयी काय वाटते बरे ...?

**pratibha.saraph@ gmail.com**

# माझ्या दृष्टीतून सुखी माणूस

**लहानशा गोष्टी, मोठा अर्थ**
**शिल्पा अष्टमकर**



सुख ही एक अशी भावना आहे जी प्रत्येकाच्या दृष्टीने वेगळी असते. काहींसाठी सुख म्हणजे भरपूर संपत्ती, आलिशान घर, गाडी; तर काहींसाठी ते म्हणजे शांत जीवन, प्रेमळ नाती आणि आरोग्य.

"माझ्या दृष्टीतून सुखी माणूस" माझ्या दृष्टीने "जो माणूस सुखी वाटतो तो सुखी" असा या शब्दसमूहाचा अर्थ होता. नंतर विचार केला मग वेळोवेळी जशी माझी वृत्ती बदलेल तशी सुखी माणसेही वेळोवेळी बदलत जातील. धर्मराजाला जशी सर्वच माणसे सुष्ट वाटली आणि दुर्योधनाला जशी सर्वच माणसे दुष्ट वाटली, त्याचप्रमाणे मी सुखी असेल त्यावेळी मला माणसे सुखी वाटतील आणि मी दुःखी असेल त्यावेळी दुःखी वाटतील. पण त्यावरून खरा सुखी कोण अथवा दुःखी कोण या गोष्टींचा उलगडा होणार नाही. पण अशा तऱ्हेने विचारांची गुंतागुंत सोडवताना श्री समर्थ रामदासांची अमर काव्यपंक्ती आठवली. "जगी सर्व सुखी असा कोण आहे?" संपूर्णतः सुखी माणूस जगात नाही हेच व्यावहारिक सत्य त्यांना मांडावयाचे आहे. पण सुखाचा शोध करणे ही मनुष्य मात्राची नैसर्गिक प्रवृत्तीच आहे. तिच्याविरुद्ध कसे जाणार? मग अशा रीतीने आपण जगाकडे पाहू लागलो की, आपल्या मनात विचार येतो, "खरे आहे जगात सुख थोडे आहे पण ते कोणाला तरी मिळते आहेच." मग हे सुख कोणाला मिळाले आहे हे पाहण्याकरिता मी आजूबाजूला नजर टाकून विचार केला, पुष्कळ वेळा आढळतात जगतानाही किरकिरत असणारी माणसे! यांची सुखाची कल्पना संकुचित आहे की व्यापक? ना. सी. फडके म्हणतात, "ज्यांची सुखाची कल्पना संकुचित असते ते मोठे नव्हेत." म्हणजे मनाच्या संकुचित किंवा व्यापक वृत्तीवर सुख अवलंबून असते. साधूसंताना आयुष्यात सुख मिळाले याचे कारण त्यांच्या मनाची व्यापक वृत्ती. सर्वांभूती परमेश्वर पाहण्याच्या वृत्तीत पाखराने शेत खाल्ले म्हणून गुरुनानकांना खेद झाला नाही, खंत वाटली नाही. माणसांना सुख मिळविण्याच्या मार्गात आणखी एक अडथळा असतो व तो म्हणजे "भीती." निर्भयता प्राप्त झाली की सुख मिळते. हा सुखाचा राजमार्ग ज्यांना सापडला ते धन्य होत. आधुनिक शोधांनी समृद्धी वाढली आहे पण सुख वाढले आहे का? सुख सोयींच्या साधनांबरोबर सुखाची समृद्धी झालेली का आढळून येत नाही? सुख हे मनाच्या समाधानी वृत्तीवर अवलंबून असते व मनाची समाधानी वृत्ती समृद्धीवर अवलंबून असते. सारांशतः म्हणावयाचे तर सुखी माणूस तो ज्याला या चार सत्याची जाणीव झाली.

१) मनाची वृत्ती संकुचित न ठेवता व्यापक केली की सुख मिळते.

२) प्रेम धर्माने भीती नष्ट होते व निर्भयतेतच सुख मिळते.

३) पराभूत मनोवृत्ती सोडून लढाऊ वृत्ती अवलंबिल्याने यश व सुख मिळते.

४) सुख उपभोगात नसते सुख त्यागात असते.

सुख हे बाह्य गोष्टींवर अवलंबून नसून अंतःकरणातून येणारा अनुभव आहे.कोट्याधीश असूनही जर माणूस अस्वस्थ असेल, सतत चिंतेत असेल, तर तो सुखी कसा म्हणावा? याउलट एक साधा शेतकरी जेव्हा आपल्या कुटुंबासोबत जेवणाच्या वेळेस हसत-खेळत संवाद साधतो, तेव्हा तो देखील तितकाच सुखी असतो जितका एखादा श्रीमंत उद्योगपती. माझ्या मते, खऱ्या अर्थाने सुखी माणूस तोच, जो आपल्या प्राप्त परिस्थितीत समाधानी आहे, आणि त्याला आपल्या कुटुंबातील प्रेम, समाजातील सन्मान आणि आत्मिक शांतता लाभली आहे.

सुखी माणसाची काही लक्षणे अशी असतात :- तो नेहमी सकारात्मक विचार करतो. त्याला इतरांविषयी द्वेष नसतो.

तो स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवतो. संकटातही तो धीर राखतो.

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तो इतरांचेही जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करतो.

सुखासाठी स्पर्धा, मत्सर, लोभ हे मार्ग कधीच योग्य नाहीत. जेव्हा आपण आपल्या छोट्या-छोट्या गोष्टींतून समाधान शोधू लागतो, तेव्हाच आपले आयुष्य खरे सुखी होते.

सुख ही कोणत्याही दुकानात मिळणारी वस्तू नाही, ती मनः स्थिती आहे. ती निर्माण करावी लागते. "सुख शोधण्यात नाही, तर अनुभवण्यात आहे." जो माणूस हा अनुभव समजून घेतो, तोच माझ्या दृष्टीने खरा सुखी माणूस आहे.



# न्युज पेपर असोसिएशनची निवड ;प्रदीप कुलकर्णी यांनी फेर निवड

पुण्यभूमी प्रतिनिधी

जयपुर:असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड करण्यात आल्याची घोषणा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष के डी चंडोला यांनी जयपूर येथे संपन्न झालेल्या संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनात केली.

संघटनेच्या जयपुर येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनाचा दिनांक २७ एप्रिल रोजी दुसरा दिवस होता.

या अधिवेशनामध्ये राजस्थान अध्यक्ष



गोपाल गुप्ता यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर राष्ट्रीय महासचिव शंकर कटीरा यांनी बैठकीत मार्गदर्शन केले. राष्ट्रीय अध्यक्ष केडी चंडोला यांनी नंतर बैठकीची सूत्रे हाती घेतल्यानंतर देशभरातील विविध राज्यांच्या राज्याध्यक्ष पदाच्या नेमणुका जाहीर केल्या. यामध्ये महाराष्ट्राच्या राज्याध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड करण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली .यावेळी अधिवेशनास उपस्थित असलेल्या महाराष्ट्रातील सर्व सदस्यांनी टाळ्याच्या गजरात या घोषणेचे स्वागत केले. व नंतर प्रत्यक्ष भेटून प्रदीप कुलकर्णी यांचे अभिनंदन केले. या समारोप प्रसंगी छाबडा सर, डॉक्टर अमृता मौर्य यांची समायोजित भाषणे झाले. राष्ट्रीय कार्यकारिणी व राष्ट्रीय कार्यकारणीतील इतर सदस्यांची घोषणा एक आठवड्याच्या आत करण्यात येईल असे यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष चंडोला यांनी यावेळी बोलताना सांगितले.



परळी:साळी समाजाच्या वतीने त्यांचा मुंजा पोटे यांचे निवासस्थानी गौरव करण्यात आला. यावेळी शासकीय तंत्रनिकेतन वनी जिल्हा यवतमाळ येथे नुकतेच पोस्टिंग मिळालेले अक्षय पोटे, पेंटिंग या प्रकारात इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झालेल्या निकिता आरबुने आणि बहुजन साहित्य संमेलन चिखली येथे धनंजय आरबुने आदी छायाचित्र दिसत आहे

# तहसीलदारांचा पुढाकार आणि आजींना मिळाले अनुदान

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड : डीबीटीची प्रक्रिया उशिरा केल्याने कुमशीच्या केशरबाई मंचारे या ८० वर्षीय आजीना अनुदान मिळत नव्हते . या आजी तहसील कार्यालयात येरझऱ्या मारत होत्या . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आजींकडे पाहिले आणि त्यांना कामाबाबत विचारणा केली . डीबीटी प्रक्रिया उशिरा झाल्याने आजींचे अनुदान मिळाले नव्हते . तात्काळ तहसीलदार शेळके यांनी सीएससी सेंटर चालकास सूचना देत आजींची डीबीटी प्रक्रिया तातडीने करून घेण्याचे आदेश दिले . त्यानुसार केंद्र संचालक सतीश जाधव यांनी सर्व प्रक्रिया केली . आजींच्या खात्यावरील दहा हजार रुपये रोख रक्कम काढून आणण्यात आली . ही रक्कम तहसीलदारांच्या हस्ते आजींना सुपूर्द करण्यात आली . त्यामुळे आजींनी सर्वांचे आभार मानले.

यावेळी तहसिलदार चंद्रकांत शेळके , पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर , संजय गांधी निराधार विभागाच्या अव्वल कारकून हेमलता परचाके , तलाठी लक्ष्मण आगलावे , संजय गांधी निराधार विभागाच्या महसूल सहायक वैशाली बहीरवाळ , सतीश जाधव , संतोष काकडे आदिंची उपस्थिती होती.सध्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाभरात संजय गांधी



, श्रावणबाळ विभागामार्फत गावोगावी कॅम्पचे आयोजन करण्यात येत असून लाभार्थ्यांची डीबीटी प्रक्रिया पूर्ण करून देण्याची मोहीम प्रशासनाने हाती घेतली आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके हे वेळोवेळी नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून वयोवृद्ध लाभार्थ्यांना तहसील कार्यालयास येण्याची गरज भासू नये यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे .

डीबीटीचा अर्ज भरून घेताना त्यावर मोबाईल क्रमांक सुद्धा टाकावा लागतो . आणि लगेच त्या मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी म्हणजेच वन टाइम पासवर्ड जातो . तो ओटीपी सांगावा लागतो . तो ओटीपी ऑपरेटरला सांगितल्यास लगेच डीबीटीची प्रक्रिया संपते . एकदा ओटीपी दिला आणि तो ऑपरेटर मार्फत संगणकावर नोंदविण्यात आला म्हणजे डीबीटीची प्रक्रिया संपलेली असते .या कॅम्पच्या वेळी कुर्ला गावच्या सरपंच मंडाबाई पांडुरंग मार्कड , उपसरपंच महादेव साहेबराव पटेकर , ग्रामपंचायत सदस्य शितल संदीप पाटील , औरंगपूरचे सरपंच गोरख महादेव चांगण , कुर्ला मंडळाचे मंडळ अधिकारी जितेंद्र वाघ , ग्राम महसूल अधिकारी संजय नेवडे , उमेश खिंडरे , दुष्यंत शेळके , सुनील प्रधान , ग्राम महसूल सेवक कृष्णा राठोड , महसूल सेवक जवरे , संगणक ऑपरेटर महेंद्र राऊत व गावकरी परीक्षित पाटील , ज्ञानेश्वर यादव , ग्रामपंचायत शिपाई बाबासाहेब कानडे , महादेव आरसुळ नवनाथ गव्हाणे , परमेश्वर गुंड , शेख खाजाभाई , भगवानराव यादव , दिगंबर शेवाळे उपस्थित होते. यावेळी बोलताना नायब तहसीलदार प्रशांत जाधव यांनी सांगितले की फार्मर आयडी सुद्धा शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक आहे . शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढून घ्यावा . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे स्वतः तालुक्यात फार्मर आयडी काढून घ्यावा यासाठी भेटी देत आहेत . तरी शेतकऱ्यांना आवाहन राहील की त्यांनी ग्री स्टॅक प्रकल्पांतर्गत आपला फार्मर आयडी काढून घ्यावा . त्यासाठी संबंधित ग्राम महसूल अधिकारी म्हणजेच तलाठी ग्रामसेवक अथवा गावचे कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा असेही त्यांनी सांगितले. बीड तालुका प्रशासनाचा वयोवृद्ध व अडाणी लाभार्थ्यांप्रती असलेला हा कनवाळूपणा निश्चितच अभिनंदन आहे . ग्रामीण भागातील लाभार्थी , नागरिक हे खरोखरच प्रशासनाचे आभारी आहेत , अशा स्वरूपाची चर्चा यावेळी ऐकण्यास मिळाली . खचितच अशाप्रकारे प्रशासन नागरिकांसाठी दोन पावले पुढे आले तर प्रशासनाकडे नागरिक आपोआपच आदराने बघतील यात शंका नसावी .

# बीड तालुका कामगार मंडळाचे हात बरबटलेले प्रा.सापनकर

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड : बीड तालुका कामगार सेतू केंद्रातील कर्मचाऱ्याकडून वृद्ध महिलांना अरे रवीच्या भाषेमध्ये बोलण व जिल्हा कामगार अधिकारी श्री श्रीहरी मुंडे व कामगार मंडळाचे राज्याचे सचिव विवेक कुंभार हे पाठराखण करतात म्हणून हे खालाचे कार्मचारी जनता चा गैरफायदा घेतात व असं बोलतात कि सचिव आमचं जवळ नातलग आहेत त्या मुळे आमचं कोणी काही करू शकत नाही श्री प्रवीण सुरवसे व तुषार कुंभार नामक कंत्राटी कर्मचारी येणाऱ्या वृद्ध कामगारांसोबत अतिशय उद्धटपणे वागतात तरी पण जिल्हा कामगार अधिकारी काही करू शकत नाही कारण श्री श्रीहरी मुंडे मानतात कि हे दोघांच्या विषय मला बोलू नका हे सचिवांचे माणसं आहेत गोरगरीब जनतेचे पैसे घेऊन अरेरावीची भाषा बोलतात बीड जिल्हा मध्ये कामगार मंडळ यांच बोगस कारभार चालू आहे.

साहित्य वाटप करताना पैसे घेईयचं रिनवल करायचा असेल तरी पैसे घेईयचं सर्रासपणे भोंगळा कारभार सुरू आता पर्यंत खुप लोकांनी तक्रार करून सुद्धा काही केले नाही जिल्हाधिकारी साहेबांना अनेक निवेदन देऊन सुद्धा या कर्मचाऱ्यांना फारक पडत नाही कंत्राटी कर्मचारी पासून जिल्हा कामगार अधिकारी व सचिव ना पैसे भेटतात म्हणून या वयोवृद्ध माणसांना आपण माय मायबोलीप्रमाणे वागवतो. मानसन्मान करतो. पण आज बीडमध्ये वातावरण एवढंच चिघळलेला असताना. त्यांना सुद्धा वर या घाणेरड्या वर्तणूक केला सामोर जावं लागतं. आई बहिणीवर शिव्या देतात. पैसे खाल्ल्याशिवाय एकही काम किंवा एकही कागद पुढे सरकवला जात नाही. म्हणजे गरिबांचे काम राहिली बाजूला. प्रत्येक कागदा माग यांचे पन्नास शंभर रुपये घेतल्याशिवाय कागद पुढे सरकत नाही. तो कागद कमीत कमी सात–आठ जणांच्या हाताखाली जात असतो. म्हणजे एखादं छोट्यातल्या छोटं काम करायचं म्हटलं तरी कचेरीत जाताना हजार रुपये तरी खिशात घेऊन जात जावे. गरीब माणूस इथे तीनशे रुपये रोजावर कामाला जातोय आणि गरिबांच्या ह्या सुविधा का गरिबांना सुविधांच्या आणि योजनांच्या आधारे लुटले जाते नुसते लुटले जाते असे नाही तर त्यांना अपमानित होऊन काम करून घ्यावे लागते. तरीही कुंभार आणि सुरवसे यांना जनसामान्याचे काही पडलेले नसतं. अपमान झालेला वृद्ध किंवा महिला हवालदिल होऊन अगदी काम नको किंवा जीव नको या भूमिकेवर ठाम होतात.

# परळीच्या मुख्य डाकघरातील चोरी

## जिथून साहित्य चोरले तिथंच आणून टाकले



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी : परळीच्या मुख्य डाक घरामध्ये आधार केंद्रातील संगणक, स्कॅनर व अन्यसुमारे साहित्याची सुमारे दीड महिन्यापूर्वी अज्ञात चोरट्याने चोरी केली होती. मात्र आज (दि.२९) सकाळी सकाळी पोस्ट ऑफिसच्या बाजूच्या बीएसएनएल कार्यालयाच्या मोकळ्या जागेत हे साहित्य एका पोत्यात आढळून आले आहे. तब्बल ५० दिवसानंतर या चोराने जिथून साहित्य चोरलेत्याच ठिकाणी परत हे आणून टाकले असल्याचा प्रकार पुढे आला आहे. दरम्यान ५० दिवसानंतर हे साहित्य परत आणून टाकले तर हे साहित्य चोरण्यामागचा नेमका उद्देश काय होता? याबाबत आता तर्क वितर्क लढवले जात आहेत.

परळीतील मुख्य डाकघरातील चोरीस गेलेले आधार केंद्राचे साहित्य पोस्टाच्या बाजूलाच असलेल्या बीएसएनएल कार्यालय आवारात आढळले आहे. परळीतील मध्यवर्ती राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकात असलेल्या मुख्य पोस्ट ऑफिस मध्ये पन्नास दिवसांपूर्वी अज्ञात चोरट्यांने आधार केंद्राचे संगणक, आय स्कॅनर आणि अन्य साहित्याची चोरी केली होती. या प्रकरणात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीसांचा तपास सुरु होता. मात्र पन्नास दिवसानंतर चोरट्याने आधार केंद्राचे सीपीयू, कीबोर्ड, आय स्कॅनर, पांढऱ्या पोत्यात भरून आणून टाकले आहे.ही बाब नागरिकांच्या लक्षात येतात याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी हे साहित्य ताब्यात घेतले आहे. पन्नास दिवसांपासून हे साहित्य कुणी चोरले होते? विशेष म्हणजे पोस्ट ऑफिस मध्ये इतर साहित्य असताना फक्त आधार केंद्राचेच साहित्य चोरून नेले होते. आता पन्नास दिवसा नंतर चोरट्यांकडून ते परत आणून टाकल्या मुळे यात काही गौडबंगाल आहे का? हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे. या घटनेचा तपास परळी शहर पोलीस करत आहेत. दरम्यान परळी टपाल करण्याच्या बाजूसच कंपाउंड मारून बीएसएनएल ची जुनी इमारत आहे. या भागात साहित्य पडलेले आढळले. मात्र समोरच भारतीय स्टेट बँक आणि इतर व्यापाऱ्यांच्या दुकानात लावलेल्या सीसीटीव्ही मध्ये साहित्य टाकणारा सापडू शकतो अशी नागरिकात चर्चा आहे.

# प्रगती विद्यालयाचे स्कॉलरशिप शिष्यवृत्ती परीक्षेत यशाची परंपरा कायम

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड : महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात आलेल्या स्कॉलरशिप शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून त्यामध्ये प्रगती विद्यालय बालेपीर बीड येथील इयत्ता पाचवी चे १० विद्यार्थी पात्र झाले आहे तसेच इयत्ता आठवी मधील २१ विद्यार्थी पात्र झाले आहे प्रगती विद्यालय बालेपीर बीड येथील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत मोठे यश संपादन केले असून सन २०२४ २०२५ साठी एकूण ३१ विद्यार्थी शिष्यवृत्ती साठी पात्र झाले आहेत विद्यालयातील शिक्षकांनी केलेले सुयोग्य नियोजन अपार कष्ट व विद्यार्थ्यांच्या मेहनतीमुळे चिकाटीमुळे एवढा मोठा निकाल आला आहे.

या निकालामुळे राज्यामध्ये दरवर्षीप्रमाणे या वर्षी पण शाळेचा नावलौकिक झालेला आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे व पालकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यशवंत गुणवंत विद्यार्थी इयत्ता पाचवी खालील प्रमाणे १) नेहरकर अक्षदा रघुनाथ २)आरेकर अथर्व अंकुश ३) परजने भाग्यश्री नारायण ४) तांबडे कुमुदिनी बाबुराव ५)बागलाने प्राची धोंडीराम ६)आघाव साहिल बाळू ७) गिरी प्रशांत नंदकुमार ८) पाखरे समीक्षा राहुल ९)गायकवाड शिवांश किसन १०) वनवे श्रेयश राजेंद्र इयत्ता आठवी मधील विद्यार्थी १)सांगळे अभिषेक अंबादास २) परजने अथर्व किरण ३) अवताडे अविष्कार दीपक ४) तांदळे हरीश महेश ५) सदगर कल्याणी दादाहरी ६)नागरगोजे नंदनी रामहरी ७) बागलाने प्रथमेश धोंडीराम ८) खेडकर सागर उद्धव ९) तळेकर समर्थ ज्ञानदेव १०)सपकाळ समृद्धी बाळू ११)माने सार्थक नितीन १२) नागरगोजे शिवकन्या शिवलिंग १३) शेवंते स्वराली सचिन १४)राऊत स्वराली गोकुळ १५) मिसाळ स्वरांजली राजेंद्र १६) बडे तनुजा बाबाराय १७)गायकवाड ऊर्जा किसन १८)पन्हाळकर वेदांत कैलास १९) हंगे वेदिका निशांत २०)राऊत विश्वजीत बाजीराव २१)बांगर यशराज तुकाराम वरील गुणवंत यशवंत विद्यार्थ्यांचा अभिनंदन प्रगती संस्थेचे संस्थापक माननीय राम कृष्ण जी बांगर साहेब सचिव सौ सत्यभामा ताई बांगर शाळेचे मुख्याध्यापक गोपाळघरे सर दिलीप कंठाळे सर सानप सर शेख सर ढवळे सर चव्हाण सर जायभाय सर घोळवे सर कदम सर वाघवाले सर ढाकणे सर नागरगोजे सर तांदळे सर कंठाळे सर मस्के सर सोनवणे मॅडम नांदलकर मॅडम ढाकणे मॅडम परजने मॅडम खाडे मॅडम खेडकर सर अधापुरे सर नागरगोजे मॅडम कुलकर्णी मॅडम अग्रवाल मॅडम मुंडे मामा निखिल केदार नारायण मुंडे नवनिर्माण व प्रगतीचे सर्व मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी या सर्वांनी वरील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# तलवाडा येथे रात्रीच्या गस्तीत पोलिसांची धडक कारवाई; चार संशयित ताब्यात

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई : तलवाडा येथे रात्रीच्या गस्तीदरम्यान तलवाडा पोलीस ठाण्याच्या पथकाने दोन स्वतंत्र घटनांमध्ये चार संशयितांना ताब्यात घेतले. पोलीस कॉन्स्टेबल सुग्रीव दत्तु रुपनर (वय ३९) आणि पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील दिलीप कोळी (वय ३७) यांनी केलेल्या या कारवाईमुळे संभाव्य गंभीर गुन्हे टळले.पहिल्या घटनेत, दिनांक २९ एप्रिल रोजी मध्यरात्री १२:३० वाजता शिवाजी चौकात साई मंदिराजवळ रुषी दादाभाऊ मरकड (वय २८) आणि सुभम संजय गिल (वय २५), दोन्ही रा. तलवाडा, हे संशयास्पदरीत्या आंधारात लपून बसलेले आढळले. पोलिसांनी विचारपूस केली असता, त्यांनी पळण्याचा प्रयत्न केला.

मात्र, पोलिसांनी पाठलाग करून त्यांना पकडले. त्यांनी थांबण्याचे समाधानकारक कारण न सांगितल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या मते, यापासून जबरी चोरी, घरफोडी किंवा वाळू चोरीसारखा गुन्हा घडण्याची शक्यता होती.दुसऱ्या घटनेत, पहाटे ०१:३० वाजता राजापूर फाट्याजवळ वैभव भाऊसाहेब ढवारे (वय १९) आणि श्रावण कृष्णा मरकड (वय १९), दोन्ही रा. तलवाडा, हे हिरो पॅशन प्रो मोटारसायकल (क्र. चक२३ट३२९९) सह संशयास्पदरीत्या आढळले. त्यांनीही पळण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी त्यांना पकडले. त्यांनी स्पष्ट कारण न सांगितल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले.

# भीम जयंती मिरवणुकीला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा - राहुल घाडगे

पुण्यभूमी प्रतिनिधी



वडवणी: विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त वडवणी येथील सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य – दिव्य व आकर्षक देखाव्यासह आज दि. ३० एप्रिल २०२५ रोजी मिरवणूक निघणार आहे. तरी या मिरवणुकीला वडवणी शहरासह तालुक्यातील आणि बीड जिल्ह्यातील भीम अनुयायानी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे. असे आव्हान जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व वडवणी नगरपंचायतीचे नगरसेवक, युवा नेते राहुल घाडगे यांनी केले आहे.

वडवणी शहरातील सार्वजनिक भीम जयंती उत्सवा निमित्तं विविध कार्यक्रम घेण्यात आले होते. यामध्ये दि.१४ एप्रिल रोजी सकाळी १० वा. अभिवादन अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यानंतर शहरासह पंचक्रोशीतील लोकांना स्नेही महाभोजन दिले आहे. तर दि. २२ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वा. आंबेडकर चौक या ठिकाणी भीम गीताचे सुप्रसिद्ध गीतकार, संगीतकार आणि अभिनेता उत्कर्ष आनंद शिंदे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. तर आज दि. ३० एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ठीक ५.३० वा. डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची आकर्षण सजावटीमध्ये भव्य दिव्य मिरवणूक निघणार आहे. यादरम्यान राजकीय, समाजिक, संस्कृतिक व प्रशासनातील अधिकारी सह विविध क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित राहुल डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेला अभिवादन करणार आहेत.तर ही मिरवणूक वडवणी शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक इथून प्रारंभ केला जाईल तर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात या मिरवणुकीचा समारोप करण्यात येणार आहे तर मिरवणुकीमध्ये देखील उपस्थित जनसमुदायांची सुरक्षेच्या संदर्भात गैरसोय होऊ नये म्हणून जयंती उत्सव समितीच्या वतीने जवळपास २०० जणांची स्वंयसेवकाची सुरक्षा रक्षक म्हणून निवड केली आहे.

# अध्यक्षपदी शिवराज मिटकरी तर सचिवपदी अनिकेत वाडकर

## भव्य शोभायात्रे सह विविध स्पर्धा व रक्तदान शिबिराचे आयोजन

पुण्यभूमी प्रतिनिधी

चकलंबा : जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या ८९४ व्या जयंतीच्या निमित्ताने २० एप्रिल रविवार रोजी रेणुका देवी मंदिर येथे विरशैव समाजाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी समाजाचे अध्यक्ष सतीशअप्पा रुकर व अनिलअप्पा शेटे, वैजिनाथअप्पा मिटकर, गणेश कापसे व शाम रुकर यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. यामध्ये महात्मा बसेश्वर जयंतीची कार्यकरणी करण्याची निवड करून जयंतीच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली. जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची ८९४ वी जयंती उत्सवाच्या व आनंदाच्या वातावरणात गेवराई शहरात साजरी करण्याचे बैठकीमध्ये ठरवण्यात आले. या जयंती उत्सवाचे अध्यक्ष शिवराज मिटकरी , उपाध्यक्ष रोहित फुलशंकर अनिकेत सचिव पदी अनिकेत वाडकर तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून साप्ताहिक गेवराई संघर्ष योद्धा चे संपादक अमोल कापसे, कोषाध्यक्ष म्हणून अजय रुकर व आनंद संभाहारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

तसेच बुधवार दि.३० एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता श्री रेणुका देवी मंदिरात जगदज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात येईल यानिमित्त निबंध स्पर्धा घेण्यात येणार असून या स्पर्धेचे बक्षीस वितरण देखील लगेच करण्यात येणार आहे. जयंती च्या निमित्तसायंकाळी ५ वा जगदज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे व्याख्यान होणार असून सर्व समाज बांधवानी याचा लाभ घ्यावा असे अध्यक्षानी आवाहन केले आहे तसेच दि.०४ मे २०२५ वार रविवार रोजी सकाळी ७ वा. जगदज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून श्री रेणुका देवी मंदिर येथून भव्य रथामधून महात्मा बसवेश्वरांच्या मूर्ती ची भव्य शोभा यात्रा काढण्यात येणार असून या शोभा यात्रेमध्ये वीरशैव महिलां च्या लेझिम पथकाच्या साथीने व वीरशैव भजनी मंडळा सोबत टाळ मृदंगच्या गजरात भव्य शोभायात्रा निघणार असून यामध्ये महिलांना एकसारख्या साडया तर पुरुषांना पांढरा पेहराव असणार आहे ही शोभा यात्रा मेन रोड मार्गे तहसील रोड,पोलीस स्टेशन मार्गे शास्त्री चौक येथे आल्यानंतर अनिल आप्पा शेटे यांच्या वतीने सर्व समाज बांधवांना थंड शरबत चे वाटप करण्यात येणार असून त्यानंतर ही शोभा यात्रा माळी गल्ली, मोमीनपुरा मार्गे पुन्हा रेणुका देवी मंदिरात येऊन प्रसाद वाटपाने या जयंतीचा उत्सवाचा समारोप होणार आहे. त्याचबरोबर या दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन देखील करण्यात येणार असल्याचे या बैठकीमध्ये ठरवले. महात्मा बसवेश्वर जयंती चे सदस्य म्हणून रवींद्र रुकर,योगेश कापसे, सुनील संभाहरे,रमेश सोसे, प्रवीण राजुरे,नंदकिशोर कापसे, विनायक स्वामी, सुरेश कापसे,शंकर संभाहरे, उमेश राजूरकर, गणेश रुकर, संतोष सोसे, राजेंद्र फ ुलशंकर, संभाजी सोसे दिपक कापसे,अक्षय शेटे, गजानन कापसे, अनिकेत कापसे,श्रीनाथ सोसे,शुभम सांभहारे, अमोल फुलशंकर, अमोल संभाहरे, बबन शंखपाळ, विशाल कापसे, रोहित फुलशंकर, राम संभाहारे, दत्ता टोणपे, दिनेश संभाहारे, नागेश अप्पा परळकर, शंकर अप्पा परळकर आदी वीरशैव लिंगायत समाज बांधव उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन उमेश राजूरकर यांनी केले तर आभार गणेश मिटकर यांनी केले.

# न्युज पेपर असोसिएशनच्या महाराष्ट्र अध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव : जयपुर– असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड करण्यात आल्याची घोषणा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष के डी चंडोला यांनी जयपूर येथे संपन्न झालेल्या संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनात केली. संघटनेच्या जयपुर येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनाचा दिनांक २७ एप्रिल रोजी दुसरा दिवस होता. या अधिवेशनामध्ये राजस्थान अध्यक्ष गोपाल गुप्ता यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर राष्ट्रीय महासचिव शंकर कटीरा यांनी बैठकीत मार्गदर्शन केले. राष्ट्रीय अध्यक्ष केडी चंडोला यांनी नंतर बैठकीची सूत्रे हाती घेतल्यानंतर देशभरातील विविध राज्यांच्या राज्याध्यक्ष पदाच्या नेमणुका जाहीर केल्या. यामध्ये महाराष्ट्राच्या



राज्याध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड करण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली. यावेळी अधिवेशनास उपस्थित असलेल्या महाराष्ट्रातील सर्व सदस्यांनी टाळ्याच्या गजरात या घोषणेचे स्वागत केले. व नंतर प्रत्यक्ष भेटून प्रदीप कुलकर्णी यांचे अभिनंदन केले. या समारोप प्रसंगी छाबडा सर, डॉक्टर अमृता मौर्य यांची समायोजित भाषणे झाले. राष्ट्रीय कार्यकारिणी व राष्ट्रीय कार्यकारणीतील इतर सदस्यांची घोषणा एक आठवड्याच्या आत करण्यात येईल असे यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष चंडोला यांनी यावेळी बोलताना सांगितले.